सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १० जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ५७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

समर्पण
संघर्ष आणि
संकल्प

राष्ट्रवादी
काँग्रेस पार्टी

२७ वा
वर्धापन दिन

स्वर्गीय अजितदादा पवार
यांना समर्पित



ठिकाण : षण्मुखानंद सभागृह, माटुंगा ( मुंबई )
दिनांक : गुरुवार, ११ जून २०२६
वेळ : दुपारी २ वाजता.

## पाऊस तर नाही, उन्हाची लाही मात्र कायम



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०९ :-** राज्यात मान्सून लांबणीवर गेला असता ९ जुन ला ही पैठणला पाऊस नाही.मात्र तालुक्यात उन्हामुळे सर्वत्र लाही लाही होत असून दुपारच्या वेळी रस्ते सामसूम झाले होते. मंगळवारी पैठणचे तापमान ३८ डिग्री सेल्सियस होते. येणारे काही दिवस असेच तापमान राहणार असल्याने व पावसाला विलंब झाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

## झी टीव्हीवर लवकरच 'दिलों की राम लीला'




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या कौटुंबिक आणि भावनिक कथा सादर करण्यासाठी ओळखली जाणारी झी टीव्ही वाहिनी लवकरच 'दिलों की राम लीला' ही नवी मालिका घेऊन येत आहे. प्रेम, नाती, भावना आणि नियती यांचा हृदयस्पर्शी प्रवास या मालिकेतून उलगडणार आहे.

या मालिकेत आस्था शर्मा आणि मिश्कत वर्मा मुख्य भूमिकेत असून, त्यांच्यासोबत ईजाज खान आणि मानसी साळवी महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. मालिकेच्या केंद्रस्थानी लीला ही श्रीमंत घरातील तरुणी आहे. संपत्ती आणि प्रतिष्ठा असूनही वडिलांच्या प्रेमाची आणि स्वीकृतीची तिला आस आहे. तिच्या आयुष्यात राम हा तिच्या वडिलांचा विश्वासू खासगी सहकारी (पीए) म्हणून येतो आणि हळूहळू तिचा जिवलग मित्र व आधार बनतो.

राम एका प्रेमळ आणि जिव्हाळ्याच्या कुटुंबातून आलेला असताना लीला पूर्णपणे वेगळ्या वातावरणात वाढलेली असते. भिन्न जगातून आलेल्या या दोघांना नियती वारंवार एकत्र आणते आणि त्यांच्यात विश्वास, काळजी व भावनिक आधारावर उभे राहिलेले सुंदर नाते निर्माण होते. मालिकेचा पहिला प्रोमो नुकताच प्रदर्शित झाला असून त्याला सोशल मीडियावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भावनिक कथानक, प्रभावी सादरीकरण आणि नात्यांतील संवेदनशील पैलूंमुळे प्रेक्षकांमध्ये मालिकेबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

# रस्त्यावर नाकाबंदी करून अनेक वाहनावर पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांची दंडात्मक कारवाई

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी पोलीस स्टेशनच्या वतीने खुलताबाद वेरूळ महामार्गावरील टी पॉइंट येथे वाहनधारकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पावले उचलत खुलताबाद पोलिसांनी येथे अचानक नाकाबंदी करत अनेक टू व्हीलर व फोर व्हीलर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वर मोठी कारवाई केली. या ठिकाणाहून वेरूळ म्हैसमाळ फुलंब्री खुलताबाद कडे जाणाऱ्या येणाऱ्या लहान मोठ्या वाहनाची नेहमी मोठी वर्दळ असते

खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन पोलीस पथकाने वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहन धाराकावर मोठी कारवाई करून इ-चलान'द्वारे दंडात्मक कारवाईचा दणका देण्यात आला. या मोहिमेत फॅन्सी नंबर प्लेट असणारी वाहने, विना लायसन्स फिरणारे चालक आणि सीट बेल्ट न वापरणाऱ्यांवर व किरकस आवाज यांच्यावर



विशेष कारवाई करण्यात आली. भर उन्हात स्वतः रस्त्यावर उतरून प्रत्येक वाहनाची बारकाईने तपासणी करणारे नव्यानेच काही दिवसापूर्वी रुजू झालेले कर्तव्यदक्ष खुलताबादचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बोडखे यांचे नेतृत्वाखालील पातखाने वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी शेख जाकिरभाई राहुल दांडगे, शेख कलीम, फिरोज उत्तम खटके आणि अंबादास पावणे यांच्यासह पोलीस पथकाने खुलताबाद वेरूळ टी-पॉईंटवर बॅरिकेड्स लावून चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांच्या या अचानक झालेल्या ॲक्शन प्लॅनमुळे बेशिस्त वाहनधारकांने वाहतुकीचे नियमाचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांनी केले

नोव्हा 2 निओआणि प्रो किरकोळ विक्रीपूर्वीच परीक्षण केले"

**नवी दिल्ली :** भारतीय स्मार्टफोन उद्योगातील अशा प्रकारच्या पहिल्याच उपक्रमात, एआय प्लस स्मार्टफोन ने आज घोषित केले की, विश्वासू ग्राहकांसाठी विक्री सुरु करण्यापूर्वीच ते संपूर्ण भारतातील परीक्षक, कंटेंट निर्माते, पत्रकार आणि तंत्रज्ञान समुदायातील सदस्यांना आपले आगामी नोवा2 नियो आणि नोव्हा 2

सोयगाव येथे शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी निवेदन



सोयगाव,दि.९ जून

फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर् सेल या मोबाईल ॲप्लिकेशनमुळे शेतकरी व कृषी सेवा केंद्र चालकांना होत असलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दुपारी एक वाजता संतप्त शेतकऱ्यांनी तहसीलदार मनीषा मेने यांना निवेदन सादर केले.सदर ॲप्लिकेशनचा वापर बंधनकारक करू नये तसेच सध्यातरी ते बंद करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.तसेच पीक विम्यातील 'ट्रिगर' पूर्ववत लागू करण्याबाबत... सोयगावतील शेतकऱ्यांनी आंदोलनाचा तीव्र इशारा निवेदनात दिला खरीप हंगाम दारात उभा असताना शासन आणि प्रशासनाच्या जाचक धोरणांमुळे आमच्यावर शेती सोडून रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आमचा संयम आता सुटला असून, शासनाने सुरू केलेले 'खत खरेदी ॲप' अत्यंत क्लिष्ट आणि डोकेदुखी ठरत आहे. फार्मर आयडी शोधणे, जमिनीनुसार मर्यादित खत नोंदणी आणि QR कोडची सक्ती यामुळे सामान्य शेतकरी कृषी केंद्रांवर चकरा मारून दमला आहे. सोयगाव तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि ग्रामीण भागात इंटरनेट चालत नाही.खत वेळेवर न मिळाल्याने पेरणी बाजूला राहील आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होईल. हे ॲप त्वरित बंद करून पूर्वीसारखीच खत विक्री सुरू करा. पीक विम्यातील 'ट्रिगर' पूर्ववत लागू करा या मागण्या साठी सोयगाव शहरातील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी निवेदन दिले.

## ऑनलाईन खत बुकिंग प्रक्रियेतील अडचणी दूर करण्याची मागणी; जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचे निवेदन

तभा.वृत्तसेवा




**सोयगाव,दि.९ जून :** सोयगाव तालुक्यासह ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ऑनलाईन ॲपद्वारे खत बुकिंग करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः लघु व अल्पभूधारक शेतकरी तसेच कृषी केंद्र चालकांना तांत्रिक त्रुटींमुळे खत उपलब्ध होण्यात अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांनी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा,निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर दंडाधिकारी विधाते साहेब,सिल्लोड-सोयगाव उपविभागीय अधिकारी निलेश आपार,जिल्हा कृषी सहायक प्रमोद पाटील व जिल्हा कृषी अधीक्षक दिपक गवळी यांना निवेदन सादर केले.

निवेदनात ऑनलाईन खत बुकिंग प्रक्रियेमधील त्रुटी तातडीने दूर करून शेतकऱ्यांना सहज व सुरळीतपणे खत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी,अशी मागणीही करण्यात आली.

याबाबत माहिती देताना जिल्हा कृषी सहायक प्रमोद पाटील यांनी मलकापूर येथूनही खताच्या रॅकचे नियोजन करण्यात येत असून,लवकरच खत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

यावेळी तेजस्विनीताई काळे या उपस्थित होत्या. शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या या मागणीमुळे खत पुरवठ्याचा प्रश्न लवकर मार्गी लागेल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

### 'हंगर फ्री वर्ल्ड' उपक्रम

जागतिक भूक दिनानिमित्त, मलाबार ग्रुपच्या मानवतावादी उपक्रम 'हंगर फ्री वर्ल्ड'ने आपल्या स्ट्रीट मील डिस्ट्रीब्युशन प्रोग्रामचा प्रभाव "रिहॅबिलिटेशन इम्पॅक्ट रिपोर्ट. इम्पॅक्ट स्टोरीज – एका दैनंदिन जेवणामुळे कसे बदलते आयुष्य" या अहवालाद्वारे अधोरेखित केला. या अहवालात, थनल संस्थेद्वारे प्रत्यक्ष स्तरावर राबविण्यात येणाऱ्या दैनंदिन अन्न वितरण मोहिमेमुळे रस्त्यावर राहणाऱ्या असुरक्षित व्यक्तींना बचाव, वैद्यकीय मदत, निवाऱ्याची सुविधा, सन्मानाची पुनर्स्थापना आणि कुटुंबीयांशी पुनर्मिलन कसे शक्य झाले, हे नोंदविण्यात आले आहे.

## सुरेखाबाई शिंदे यांचे निधन



**सोयगाव,दि.९ जून :** तालुक्यातील जरंडी येथील सुरेखाबाई शेनफडू शिंदे( वय-५६)यांचे सोमवारी (दि.८)सकाळी साडे सहा वाजता निधन झाले.दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होता. हॉटेल व्यावसायिक विष्णू शिंदे यांच्या त्या आई होत.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of Election : Maharashtra Legislative Council from Nanded Local Authorities Constituency**

**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Nanded Local Authorities Constituency | AMARNATH ANANTRAO RAJURKAR | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Nanded Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of Election : Maharashtra Legislative Council from Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency | SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH**
At Post Gokul, Near Sawat Mandir, Phulambri,
Dist. Chh. Sambhajinagar (Aurangabad) 431 111

**Name of political party : Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election : Maharashtra Legislative Council from Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

**Name of Constituency : Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

I **SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH)**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : AMARNATH ANANTRAO RAJURKAR**
'Devashish', H.No.1/2/113, Shivajinagar, Dist. Nanded 431602

**Name of political party : Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election : Maharashtra Legislative Council from Nanded Local Authorities Constituency**

**Name of Constituency : Nanded Local Authorities Constituency**

I **AMARNATH ANANTRAO RAJURKAR,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(AMARNATH ANANTRAO RAJURKAR)**

## संक्षिप्त

### तापमान वाढणारच

नवी दिल्ली: जागतिक तापमानात दोन अंश सेल्सिअसने वाढ झाली, तरी भारतात मान्सूनकाळातील उष्ण आणि दमट हवामान अधिक धोकादायक ठरू शकते. त्यामुळे उन्हाळ्यातील जीवघेण्या उष्णतेचा त्रास दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे, असा इशारा नव्या संशोधनातून देण्यात आला आहे. हे संशोधन 'अमेरिकन जिओफिजिकल युनियन डव्हान्सेस' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे. 'आयआयटी गांधीनगर' तसेच अमेरिकेतील स्टॅनफोर्ड आणि पर्ड्यू विद्यापीठातील संशोधकांनी हा अभ्यास केला आहे.

### आशियाई बाजारात तेजी

नवी दिल्ली : पश्र्चिम आशियातील तणाव कमी झाल्याच्या बातमीमुळे जागतिक बाजारांना आज सकारात्मक संकेत मिळत आहेत. मागील सत्रात अमेरिकन बाजार संमिश्र निकालांसह बंद झाले. डाऊ जोन्स फ्युचर्समध्येही आज तेजी दिसून येत आहे. मागील सत्रात युरोपियन बाजारांमध्ये संमिश्र व्यवहार दिसून आले. आशियाई बाजारांमध्येही आज तेजी दिसून येत आहे. मागील सत्रात अमेरिकन शेअर बाजार संमिश्र निकालांसह बंद झाले, शॉर्ट-कव्हरिंगच्या पार्श्र्वभूमीवर चिप उत्पादक कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली.

### नैसर्गिक वायूचा साठा

अंदमान : सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, विशेषतः मध्य-पूर्वेतील तणावामुळे इंधन दर आणि पुरवठ्याबाबत जगभरात चिंतेचे वातावरण आहे. अशा आव्हानात्मक परिस्थितीत भारतासाठी एक ऐतिहासिक आणि अत्यंत सकारात्मक बातमी समोर आली आहे. भारताचे 'ऊर्जा महाशक्ती' बनण्याचे स्वप्न आता अधिक जवळ आले असून, अंदमान समुद्रात सापडलेला नैसर्गिक वायूचा साठा देशाच्या ऊर्जा सुरक्षेला नवी दिशा देणारा ठरत आहे.

### १५ ऑगस्टपासून विमान सेवा

मुंबई : नवी मुंबई आणि सिंधुदुर्ग दरम्यानची बहुप्रतीक्षित विमानसेवा स्वातंत्र्यदिनापूर्वी म्हणजेच १५ ऑगस्टपूर्वी प्रत्यक्ष सुरू होणार आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी 'फ्लाय-९१' या विमान कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चॅको यांच्यासोबत मंत्रालयात घेतलेल्या उच्चस्तरीय बैठकीत याविषयी आढावा घेतला. या नव्या विमानसेवेमुळे मुंबई आणि कोकणमधील प्रवासाचा वेळ कमालीचा कमी होणार असून, गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

### प्रमोशन दरम्यान अपघात

पुणे : कपबशी चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने पुणे येथून सांगली येथे जात असताना सातारा जिल्ह्यातील काशीळ येथे ३ वाहने एकमेकांवर आदळून कार अपघात झाला. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झालेली नसून मुका मार लागला आहे. सदर प्रवासात अभिनेत्री पूजा सावंत, अभिनेता ऋषी मनोहर आणि चित्रपटाचे प्रसिद्धी प्रमुख दर्शन मुसळे या गाडीतून प्रवास करत होते. गाडीचे नुकसान झाले असून गाडीतील सर्वजण हे सुखरूप आहेत.

### टायर गोदामाला आग

ठाणे : ठाणे जिल्ह्यातल्या एका टायर गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. त्यामुळे काही काळ नागरिकांची धावपळ उडाली होती. शिळफाटा परिसरात काही काळ तणावाचं वातावरण पाहायला मिळालं होतं. दुरुन धुराचे प्रचंड लोट पाहायला मिळाले त्यामुळे घबराट पसरली.

### भीक मांगो आंदोलन

नागपूर : जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात २० टक्के कपात केल्याच्या निषेधार्थ मनसेच्या वतीने नागपुरातील जिल्हा परिषद शिक्षण विभागासमोर अर्धनग्न होऊन 'भीक मांगो' आंदोलन करण्यात आले.

# मोदींच्या होमपीचवर काँग्रेसला भोपळा !

वृत्तसंस्था






गांधीनगर : गुजरातच्या चार राज्यसभेच्या जागांसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विरोधकांकडून एकही उमेदवारी अर्ज भरण्यात आलेला नाही. त्यामुळे भाजपचे चारही उमेदवार बिनविरोध विजयी होतील. त्याबद्दलची औपचारिक घोषणा शिल्लक आहे. हा क्षण भाजपसाठी ऐतिहासिक मानला जात आहे. गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच गुजरातमधून राज्यसभेवर काँग्रेसचा एकही खासदार जाणार नाही. त्यामुळे राज्यसभेच्या पातळीवर काँग्रेसमुक्त गुजरात झाल्याचा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष जगदीश विश्र्वकर्मा यांनी केला. तर यावरुन काँग्रेसनं तिखट प्रतिक्रिया दिली आहे. हा भाजपचा अहंकार असल्याचं प्रत्युत्तर काँग्रेसचे प्रवक्ते मनीष दोशी यांनी दिलं आहे.गुजरातमधून काँग्रेसकडून केवळ शक्तिसिंह गोहिल राज्यसभेवर आहेत. त्यांचा कार्यकाळ संपत आलेला आहे. राज्याच्या विधानसभेत एकूण १८२ आमदार आहेत. काँग्रेसकडे केवळ १२ आमदार आहेत. २०२२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसनं विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद गमावलं. यानंतर आता काँग्रेसवर आणखी मोठी नामुष्की ओढावली आहे.

गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर अशी स्थिती पहिल्यांदाच निर्माण झालेली आहे.

२०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळीभाजपननरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार जाहीर केलं. तेव्हा त्यांनी काँग्रेस मुक्त भारताची घोषणा दिली होती. काँग्रेसला राजकीयदृष्ट्या संपवणं हा उद्देश नसून देशातून काँग्रेस संस्कृती (भ्रष्टाचार, घराणेशाही आणि मतपेटीचं राजकारण) संपवणं हा आपला हेतू असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. महात्मा गांधी, सरदार पटेल यांच्यासारख्या दिग्गजांच्या जन्मभूमीत काँग्रेस सातत्यानं कमकुवत झाली आहे.

गुजरातमधून राज्यसभेवर ११ जण जातात. पहिल्यांदाच या सर्वच्या सर्व ११ जागांवर भाजपचे सदस्य असतील. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पहिल्यांदाच शून्यावर आली आहे. गुजरातमध्ये लोकसभेच्या २५ जागा आहेत. पैकी २४ जागांवर भाजपचे खासदार आहेत. काँग्रेसला केवळ १ जागा मिळालेली आहे. गेनीबेन ठाकोर गुजरातमधील काँग्रेसच्या एकमेव खासदार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांच्या होमपीचवर भाजपनं काँग्रेसला चीतपट केलं आहे. राज्याच्या राजकारणात हा क्षण ऐतिहासिक मानला जात आहे.

# राज्यातील निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होणार; १३ विभागांची नव्याने रचना, मंत्रिमंडळ बैठकीत ४ मोठे निर्णय

तभा वृत्तसेवा



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेसह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेस सामान्य प्रशासन विभागाकडून मान्यता देण्यात आली असून १३ विभागांची पुनर्रचना होणार आहे. यामुळे एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे स्वतंत्र विभाग होणार आहेत. सध्या ३३ प्रशासकीय विभाग असून त्यांची संख्या १० ने वाढून ४३ पर्यंत पोहोचणार आहे. विभागांची पुनर्रचना होणार असली तरी नवीन पद निर्मिती मात्र होणार नाही. पुनर्रचनेमुळे आता सदर विभागांना अधिक सुलभपणे काम करता येईल, अशा पद्धतीने कामकाजांची विभागणी होणार असून यातून निर्णय प्रक्रिया गतीमान होण्यास मदत होणार आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयासह इतरही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी यांना मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अर्थ खात्याने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतुदींना सुसंगत आणि सूसत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा तसेच त्याअन्वये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

दरम्यान, उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडसाठी कर्ज उभारणीकरता अधिकारात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून अध्यादेश काढण्यास तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

# गॅस गळतीमुळे दोन कामगारांचा मृत्यू

तभा वृत्तसेवा




पुणे : तळेगाव एमआयडीसी परिसरातील एका नामांकित कंपनीत मंगळवारी घडलेल्या भीषण दुर्घटनेत दोन कामगारांचा मृत्यू झाला असून तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. कंपनीच्या प्लांटमध्ये कार्बन डायऑक्साइड वायूची गळती झाल्याने हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली असून कामगारांच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्र्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मृत कामगारांची नावे गणेश उंबरे आणि वैभव थोरात अशी आहेत. तर श्रीकृष्ण साहू, गौरीशंकर शर्मा आणि नरसिंह पाटील हे तिघे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीतील एका विभागात नेहमीप्रमाणे काम सुरू असताना दुपारच्या सुमारास कार्बन डायऑक्साइड वायूची गळती सुरू झाली. काही क्षणांतच परिसरातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याने कामगारांना श्र्वास घेण्यास त्रास होऊ लागला. या घटनेत पाच कामगार वायूच्या संपर्कात आले.

यातील गणेश उंबरे आणि वैभव थोरात हे दोघे अचानक बेशुद्ध पडले. त्यांना तातडीने मदत करण्याचे प्रयत्न झाले, मात्र ऑक्सिजनअभावी आणि वायूचा परिणाम झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. दुर्घटनेची माहिती मिळताच कंपनी प्रशासनाने तातडीने आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित केली. प्लांटमधील इतर कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले. तसेच एमआयडीसी सुरक्षा विभाग, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, वायू गळती नेमकी कशामुळे झाली, याचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि औद्योगिक सुरक्षा विभागाने तपास सुरू केला आहे. तांत्रिक बिघाड, यंत्रणेमधील त्रुटी किंवा मानवी चूक यापैकी कोणते कारण या दुर्घटनेमागे आहे, याचा तपास केला जात आहे.

# गुटखा माफियांचा अन्न व औषध प्रशासनाच्या पथकावर जीवघेणा हल्ला

तभा वृत्तसेवा



छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यात गुटखा माफियांची मुजोरी टोकाला पोहोचली आहे. वाळूज परिसरातील रहीमपूर येथे प्रतिबंधित गुटख्यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या पथकावर गुटखा माफियांनी जीवघेणा हल्ला केला आहे. महिला अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांच्या अंगावर भरधाव स्कॉर्पिओ घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. एवढेच नव्हे तर, अधिकाऱ्यांना धमकावून आरोपींनी जप्त केलेला गुटख्याचा ट्रक उघडपणे पळवून नेला. या संपूर्ण थराराचा व्हिडिओ समोर आला असून पोलीस दलासह प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली आहे.

एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक निर्देशानंतर, एफडीएच्या पथकाने मंगळवारी ९ जून पहाटे रहीमपूर परिसरात सापळा रचला होता. गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने एका आयशर ट्रकला अडवून त्याची तपासणी केली असता, त्यात तब्बल २५ पोती प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला आढळून आला. हा कोट्यवधींचा माल जप्त करून पथक पोलीस संरक्षणाची वाट पाहत होते. पथक घटनास्थळी असतानाच अचानक एका विनानंबर काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून ५ ते ६ गुंड तिथे धडकले. त्यांनी गाडीतून उतरताच यांना गोळ्या घाला, अशा आरोळ्या ठोकल्या आणि थेट अधिकाऱ्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

या गुंडांनी महिला अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांना लक्ष्य केले. त्यांना धडक देण्यासाठी एका आरोपीने गाडी त्यांच्या अंगावर घातली आणि त्यांचा पाठलाग केला. मात्र, सुरसे यांनी कमालीचे प्रसंगावधान राखत बाजूला उडी मारली आणि त्या बालंबाल वाचल्या. या गोंधळाचा फायदा घेत माफियांच्या साथीदारांनी गुटख्याने भरलेला तो आयशर ट्रक घटनास्थळावरून वेगाने पळवून नेला. सरकारी अधिकाऱ्यांवर झालेल्या या हल्ल्यामुळे पोलीस यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. या प्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आणि धमकावल्याप्रकरणी गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, पळून गेलेला ट्रक आणि इतर मुख्य फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

# रेल्वेची तिकीट बुकिंग प्रक्रिया होणार सोपी

वृत्तसंस्था




नवी दिल्ली : रेल्वेच्या तिकीट बुकींगची प्रक्रिया आता सोपी होणार आहे आणि एका वेळी अधिक प्रवासी ऑनलाइन तिकीट बुक करू शकणार आहे. रेल्वेचं हे नवं अपग्रेड ऑगस्ट महिन्यात सुरू होणार आहे. रेल्वे तिकीट बुकिंगच्या इतिहासातील सर्वात मोठं अपग्रेड लवकरच भारतीय रेल्वे आणत आहे. १९८६मध्ये सुरु केलेल्या ४० वर्ष जुन्या आरक्षण प्रणालीच्या (झरीीशपसशी ठशीर्शीींळेप ड्रीींशा) जागी एक नवीन अत्याधुनिक एआय-आधारित प्रणाली सुरू होणार आहे. यामुळे ट्रेन तिकिट बुकिंग वेगवान, अधिक विश्र्वासार्ह आणि सोपी होणार आहे. ऑगस्ट महिन्यापासून हळूहळू ही नवीन प्रणाली लागू करण्यात येणार आहे.

रेल्वे मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी रेल भवन येथे या कामाच्या प्रगतीची पाहणी केली. जुन्या प्रणालीतून नवीन प्रणालीचा वापर करून तिकिट बुकिंग करताना प्रवाशांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. या बैठकीत रेल राज्य मंत्री वी. सोमन्ना आणि रवणीत सिंघ बिट्टूही उपस्थित होते.

सध्या भारतीय रेल्वेमध्ये वापरली जाणारी आरक्षण प्रणाली १९८६मध्ये सुरू करण्यात आली होती. तेव्हापासून ते सेवेमध्ये काही वर्षांमध्ये छोटे-मोठे बदल केले गेले. पहिल्यांदाच पूर्ण सिस्टिम बदलून नवीन प्रणाली सुरू होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन प्रणाली बनवली गेली आहे. प्रवाशांच्या वाढत्या संख्येला सामावून घेऊन ऑनलाइन तिकीट बुकिंग पहिल्यापेक्षा अधिक सोपी व सरल करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भारतीय रेल्वेवर २००२मध्ये ऑनलाइन तिकीट बुकिंगची सेवा सुरू करण्यात आली तेव्हापासून सर्वाधिक तिकिटं काउंटरऐवजी घरबसल्या ऑनलाइनचं केली जातात. तब्बल ८८ टक्के तिकिटं डिजिटल संकेतस्थळांवरून बुक केली जातात. नव्या प्रणालीतील बुहचर्चित सेवा म्हणजे वेटिंग लिस्ट यादीमधील बदल. आता यादी जाहीर होण्यापूर्वीच प्रवाशांसाठी एआयच्या मदतीने वेटिंग लिस्टचा अंदाज सादर केला जाईल. एआय टूल्सचा वापर करून तुमचं तिकिट कनफर्म होण्याची किती टक्के शक्यता आहे हे दाखवलं जाईल. त्यामुळे प्रवासाचं नियोजन करणं सोपं होणार आहे. या प्रणालीची अचूकता ५३ टक्क्यांवरून ९४ टक्के सुधारणा झाली आहे. ही प्रणाली प्रवाशांसाठी किफायतेशीर ठरणार आहे.

सध्या भारतीय रेल्वे आपले सर्व व्यवहार डिजिटल करण्याचा प्रयत्न करत आहे. याचाच हा एक भाग आहे.ही नवीन तिकीट बुकिंगची सिस्टिम ऑगस्टपासून सुरू होणार आहे. देशभरातली प्रवाशांना या सेवेचा मोठा फायदा होणार आहे.

# पुण्यात पाणीकपात जाहीर!

तभा वृत्तसेवा

पुणे : मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब आणि खडकवासला धरण साखळीतील झपाट्याने घटणाऱ्या पाणीसाठ्यामुळे पुणेकरांवर पाणीकपातीची कुऱ्हाड कोसळली आहे. शहरात येत्या सोमवारपासून ( १५ जून) एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.

पुढील तीन महिने पिण्याच्या पाण्याची गरज, आषाढी वारीसाठी लागणारे पाणी आणि शेतीसाठी आवश्यक आवर्तने यांचा विचार करता उपलब्ध साठ्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक असल्याचे या वेळी महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी सर्वपक्षीय नेत्यांपुढे नमूद केले. उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बीडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते नीलेश निकम, काँग्रेसचे गटनेते चंदू कदम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर; तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकुमार जगताप या बैठकीस उपस्थित होते.

यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज असल्याने चिंता वाढली आहे. धरणांमधील पाण्याचे बाष्पीभवन, वाढती लोकसंख्या आणि वाढलेली मागणी लक्षात घेता पुढील तीन महिने उपलब्ध जलसाठ्यावर तग धरण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर आहे.

# उमरखाडीत म्हाडा उभारणार ४० अन् ८१ मजल्यांचे ७ गगनचुंबी टॉवर्स

तभा वृत्तसेवा

मुंबई: मुंबईतील कामाठीपुरा परिसराच्या समूह पुनर्विकासानंतर आता भायखळ्यातील उमरखाडी परिसराच्या कायापालटाची तयारी सुरू झाली आहे. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने उमरखाडीतील ६.२३ एकर क्षेत्रावरील ८१ जुन्या इमारतींच्या समूह पुनर्विकासाचा प्राथमिक आराखडा तयार केला आहे. या प्रकल्पामुळे दोन हजारांहून अधिक रहिवाशांचे पुनर्वसन होणार असून परिसरात उंच निवासी संकुले उभारण्याची योजना आखण्यात आली आहे.

कामाठीपुरा पुनर्विकासासाठी अवलंबलेल्या बांधकाम आणि विकास संस्था (सी अँड डी) प्रारूपानुसारच उमरखाडी परिसराचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंडळाने तयार केलेल्या प्राथमिक प्रस्तावानुसार या भागातील ८१ इमारती एकत्रितपणे पुनर्विकासासाठी घेतल्या जाणार आहेत. यामध्ये ९ पीएमजीपी इमारतींसह उपकरप्राप्त आणि काही खासगी इमारतींचाही समावेश आहे.




या इमारतींमध्ये एकूण १,९२८ निवासी आणि २६८ अनिवासी गाळे आहेत. बहुतांश इमारती दुरुस्तीपलीकडे गेल्याचे सांगितले जात असून पुनर्विकासाला मंजुरी मिळाल्यास रहिवाशांच्या सुरक्षित निवासाचा प्रश्र्न मार्गी लागण्याची अपेक्षा आहे.

प्राथमिक आराखड्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या ८१ इमारतींच्या जागी ४० ते ८१ मजल्यांच्या सात उंच इमारती उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून परिसराचे संपूर्ण रूपांतर करण्याचा म्हाडाचा मानस आहे. पुनर्विकासानंतर आधुनिक सुविधा आणि नियोजनबद्ध पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगितले जात आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे ४,५०१.९७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मंडळाच्या अंदाजानुसार, सी अँड डी प्रारूपानुसार प्रकल्प राबविल्यास सुमारे १,०४१.७४ कोटी रुपयांचा महसूल मिळू शकतो. त्यामुळे याच प्रारूपाला अंतिम स्वरूप देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर पात्रता निश्र्चितीची प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्यानंतर इमारती रिकाम्या करून पुनर्विकासाची अंमलबजावणी केली जाईल. पात्र निवासी रहिवाशांना दरमहा २५ हजार रुपये घरभाडे दिले जाणार असून दुसऱ्या वर्षी ते २७,५०० रुपये आणि तिसऱ्या वर्षी ३०,२५० रुपयांपर्यंत वाढविले जाणार आहे.

अनिवासी गाळेधारकांना प्रति चौरस फूट १०० रुपये दराने भाडे दिले जाणार असून त्यामध्ये दरवर्षी १० टक्के वाढ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उमरखाडी पुनर्विकासाचा प्राथमिक प्रस्ताव तयार झाला असून आता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. हा प्रस्ताव अंतिम झाल्यानंतर राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच या बहुचर्चित पुनर्विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा होणार आहे.

सोलापूर तरुण भारत
arat.com, epaper.dainiktarunbharat.com
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# ही लढाई सोपी नाही

सरकारला प्रश्न विचारणे, व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविणे, हा राज्यघटनेने दिलेला हक्क बजावण्याबाबत आज जनतेमध्ये कमालीची जागृती झालेली असल्याने, अनेक जण व्यवस्था आणि सरकारच्या विरोधात बंडाच्या पवित्र्यात दंड थोपटून उभे राहू लागले आहेत. समाज जागा झाला आहे, जागरूक झाला आहे. पण या जागरूकतेमुळेच, एका महत्त्वाच्या मुद्याचा सामाजिक विसर पडेल की काय अशी भीती वाढू लागली आहे. सारे काही सरकारने केले पाहिजे, समाजातील प्रत्येक बऱ्या-वाईटास सरकार आणि यंत्रणांना जबाबदार धरून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या शक्तीची जाणीव झाल्यापासून समाजाची स्वतःकडे वळून पाहण्याची सवय कमी होत आहे की काय, याचा शोध घ्यायची वेळ येणार आहे. सरकारसोबत समाजानेही आत्मचिंतन करावयास हवे. त्याकडे दुर्लक्ष झालेच, तर त्याचे परिणाम काळजी करावयास लावणारेच असतील. महागाई, बेरोजगारी, शिक्षणव्यवस्थेतील गैरव्यवहार आदी बाबींमुळे आजच्या तरुणाईचे भवितव्य टांगणीला लागले आहे, हे खरेच आहे. या समस्यांबाबत कमालीची जागरूकता निर्माण झाली असून या समस्यांच्या विरोधात सरकारला जाब विचारणारा तरुण रस्त्यावर उतरू लागल्याने, समस्यांचे गांभीर्य व्यवस्थांना नजरेआड करता येणार नाही, हे वास्तव आहेच, पण याच संघर्षात, तरुणाईच्या भविष्यालाच आव्हान देणाऱ्या काही समस्या मात्र उग्र होत असताना आणि त्याच्या विरोधात संघर्षाकरिता दंड थोपटण्यासाठी तरुणाईनेच पुढाकार घेण्याची गरज आहे. या समस्येचे काही दुष्परिणाम अनेक घराघरांपर्यंत पोहोचू लागलेले आहेत. केवळ तरुण पिढीच नव्हे, तर अनेक कुटुंबे या समस्येपायी उद्ध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे आणि तरुण पिढी मात्र त्याची फारशी दखल घेताना दिसत नसल्याने, ही समस्या सातत्याने सुखैनेव वाढतच चालली आहे. ही बाब गंभीर आहेच, पण केवळ तरुणांच्या, कुटुंबांच्याच नव्हे, तर देशाच्या भवितव्याच्या दृष्टीनेही हिताची नसल्याने, समाजाला घडविण्याच्या कामी प्रभावी ठरणारा घटक म्हणून तरुण पिढीने या समस्येला प्राधान्य द्यावयास हवे. सुदैवाने, या समस्येबाबत सरकार आणि सरकारी यंत्रणा कमालीच्या जागरूक असलेल्या दिसतात. ती दूर करण्यासाठी सातत्याने सर्व पातळ्यांवर कठोर प्रयत्नदेखील सुरू असलेले दिसतात, पण ज्यांना या समस्येने ग्रासले आहे, त्या तरुणाईची मात्र या कामी सरकारला पुरेशी साथ मिळत नसावी. ही समस्या म्हणजे, अमली पदार्थांच्या व्यसनाच्या विळख्यात ओढल्या जाणाऱ्या तरुण पिढीच्या भविष्यासमोर उभी राहिलेली ही समस्या पुसून टाकण्यासाठी तरुणांनीच पुढाकार घ्यायची गरज.

महाराष्ट्राला औद्योगिक प्रगती, शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक नेतृत्वाची मोठी परंपरा लाभलेली आहे. या परंपरेचा महाराष्ट्राने नेहमीच अभिमान बाळगला आहे. परंतु राज्यातील अंमली पदार्थांच्या विळख्याचे संकट मात्र, या परंपरेस आतून पोखरणारे ठरत आहे. पुणे-अहिल्यानगर मार्गावरील तुळापूर येथील एका शेतघरातील प्रोजेक्ट एक्स नावाच्या एका रेव्ह पार्टीवर पोलिसांच्या गुन्हे शोध शाखेने छापा घातल्यानंतर मद्यधुंद अवस्थेत सापडलेल्या तरुण-तरुणींच्या टोळक्याने या संकटाचे प्रश्नचिन्ह पुन्हा ठळक केले आहे आणि मुंबईच्या वरळी येथील एका संगीत कार्यक्रमात एका तरुणाच्या अति मद्यसेवनामुळे ओढवलेल्या मृत्यूने समाजास अंतर्मुख होण्यास भाग पाडले आहे. गेल्या काही वर्षांत मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, पिंपरी-चिंचवड यासारख्या शहरांमध्ये अंमली पदार्थांच्या तस्करीची, विक्रीची आणि सेवनाची प्रकरणे वेगाने वाढली आहेत. अशा घटना समोर आल्या की समाज नेहमीच सरकारला धारेवर धरण्यासाठी सरसावतो. तसे व्हायला हवेच, पण ज्या घरांतील तरुण मुले-मुली अशा पार्ट्यांमध्ये देहभान आणि सारे काही विसरून आपल्या भवितव्यासमोर स्वहस्ते प्रश्न निर्माण करतात, त्या घरांच्या जबाबदारीसाठी कोणास धारेवर धरावयाचे हा प्रश्न मात्र शिल्लक राहतो. तुळापूरच्या त्या पार्टीत अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांचा धिंगाणा व्यवस्थेला जाब विचारणारा आहेच, पण ज्या समस्यांसाठी ही तरुणाई सरकारच्या विरोधात दंड थोपटून उभी राहत असते, तीच तरुणाई समाजासमोर असे प्रश्न निर्माण करण्यास जबाबदार असेल, तर त्याचा जाब कोणास विचारावा आणि त्याची जबाबदारी समाजाने का घ्यायची नाही, हा प्रश्न विचारला गेला पाहिजे. तो पचण्यास अवघड आहे, हे खरेच, पण त्यामुळे त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. कारण या समस्येने केवळ कायदा-सुव्यवस्थेचाच नव्हे तर संपूर्ण समाजव्यवस्थेचाच प्रश्न निर्माण केला आहे.

अमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेच्या या वाढत्या संकटाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अमली पदार्थविरोधी विशेष टास्क फोर्सची स्थापना केली. राज्याच्या इतिहासात प्रथमच अंमली पदार्थांविरोधात स्वतंत्र आणि केंद्रीकृत स्वरूपाची यंत्रणा उभारण्यात आली. राज्याने या समस्येची गांभीर्याने दखल घेतल्याचे त्यातून दिसून आले. मात्र जवळपास तीन वर्षांनंतरही, परिस्थितीमध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही. टास्क फोर्सची स्थापना झाली, मोठमोठ्या कारवाया झाल्या, हजारो कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त झाले; तरीही राज्यातील अमली पदार्थांचा सुळसुळाट मात्र थोपवता आलेला नाही. याचे उत्तर शोधण्यासाठी केवळ आकडेवारीकडे पाहून चालणार नाही. त्यामागील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मानसिक वास्तव समजून घ्यावे लागेल. अमली पदार्थांविरोधी टास्क फोर्सच्या स्थापनेनंतर राज्यभरात मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्या. अनेक उत्पादन केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली. हजारो कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अनेक तस्करांना अटक झाली. काही ठिकाणी संघटित गुन्हेगारीविरोधी कायद्यांचाही वापर करण्यात आला. परंतु याच आकडेवारीची दुसरी बाजू अधिक अस्वस्थ करणारी आहे. जप्तीचे आकडे जितके वाढतात, तितकाच एक प्रश्न मोठा होतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त होत असेल तर, त्या व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्यांची संख्या किती असेल आणि त्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी बाजारात प्रत्यक्ष किती माल पोहोचत असेल, हा प्रश्न केवळ सरकारला विचारणे पुरेसे नाही. याचे उत्तर शोधण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा.

पूर्वी अमली पदार्थांचे सेवन हे महानगरांतील उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित असल्याचा समज होता. आज तो पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. म्हणूनच, अंमली पदार्थांच्या प्रश्नाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही. हा प्रश्न समाजाच्या आरोग्याशी, कुटुंबव्यवस्थेशी आणि भविष्याशी जोडलेला आहे. एखादा तरुण व्यसनाधीन होतो तेव्हा त्याचा परिणाम फक्त त्याच्यावर होत नाही. त्याचे शिक्षण विस्कळीत होते, रोजगाराच्या संधी कमी होतात, मानसिक संतुलन बिघडते आणि संपूर्ण कुटुंब संकटात सापडते. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांमध्ये व्यसन हा कौटुंबिक कलहाचा प्रमुख विषय बनत आहे. अंमली पदार्थांचा वाढता वापर आणि गुन्हेगारी यांचा परस्परसंबंधही अत्यंत गंभीर आहे. व्यसनाधीन व्यक्तींमध्ये आर्थिक गुन्हे, हिंसाचार आणि लैंगिक अत्याचार यांचे प्रमाण तुलनेने अधिक असते. ड्रग्जच्या पैशातून संघटित गुन्हेगारी वाढते. हवाला व्यवहार, खंडणी, शस्त्रांची तस्करी आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क यांना आर्थिक बळ मिळते. त्यामुळे अमली पदार्थांचा प्रश्न हा अखेरीस राष्ट्रीय सुरक्षेशीही जोडला जातो. म्हणूनच, या समस्येकडे केवळ सनसनाटी गुन्हेगारी म्हणून न पाहता मानवी आणि सामाजिक संकट म्हणून पाहिले पाहिजे.

आज महाराष्ट्र एका वळणावर उभा आहे. एका बाजूला प्रगत राज्य अशी ओळख भक्कम होत आहे तर दुसऱ्या बाजूला तरुण पिढीला गिळंकृत करण्यासाठी सज्ज असलेले अमली पदार्थांचे जाळे आहे. कोणतेही युद्ध जिंकण्यासाठी केवळ शस्त्र पुरेसे नसते. त्यासाठी व्यापक सामाजिक जागरूकता, कठोर राजकीय इच्छाशक्ती, प्रभावी पुनर्वसन व्यवस्था आणि कुटुंबसंस्थेची मजबूत साथ आवश्यक असते. अन्यथा कठोर कारवाया होत राहतील, टास्क फोर्सची यंत्रणा विस्तारत राहील; पण समाजाच्या हातातून त्याची तरुण पिढी निसटत राहील.

## आंतरराष्ट्रीय

# मध्यपूर्वेतील अस्थिरतेचे नवे आव्हान

प्रा. जयसिंग यादव

भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला लेबनान हा देश आकाराने लहान असला, तरी मध्यपूर्वेच्या राजकारणात त्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या काही दशकांपासून हा देश प्रादेशिक शक्तिसंघर्ष, धार्मिक ध्रुवीकरण, बाह्य हस्तक्षेप आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता यांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अशा परिस्थितीत लेबनॉनमध्ये पुन्हा वाढत असलेला तणाव आणि युद्धविरामाच्या प्रयत्नांबाबत निर्माण झालेली अनिश्चितता ही केवळ एका देशाची समस्या नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या भवितव्याशी संबंधित बाब आहे. हिजबुल्लाहची भूमिका, इस्रायलची सुरक्षा धोरणे, इराणचा प्रभाव आणि अमेरिकेची मध्यस्थी यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. आज जग एका अशा टप्प्यावर उभे आहे, जिथे युद्धे केवळ रणांगणावर लढली जात नाहीत, तर राजनैतिक मंचांवर, आर्थिक धोरणांमध्ये आणि जनमताच्या पातळीवरही लढली जातात. लेबनानमधील परिस्थिती हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. संघर्षातील प्रत्येक पक्ष आपली भूमिका योग्य असल्याचा दावा करतो; परंतु या सर्व दाव्यांच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे या संघर्षाचा शेवट नेमका कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या मार्गाने होणार आहे? मध्यपूर्वेतील राजकारण समजून घेताना हिजबुल्लाहकडे केवळ एका सशस्त्र संघटनेच्या रूपात पाहणे अपुरे ठरते. लेबनॉनच्या सामाजिक आणि राजकीय संरचनेत या संघटनेचे खोलवर अस्तित्व आहे. देशातील अनेक भागांमध्ये तिचा प्रभाव केवळ सुरक्षा विषयांपुरता मर्यादित नसून सामाजिक सेवा, राजकीय प्रतिनिधित्व आणि स्थानिक नेतृत्वाशीही जोडलेला आहे. त्यामुळे लेबनॉनमधील कोणतीही शांतता प्रक्रिया हिजबुल्लाहला पूर्णपणे बाजूला ठेवून यशस्वी होईल, अशी अपेक्षा वास्तववादी वाटत नाही.

शांततेसाठी नेहमीच संवाद आवश्यक असतो आणि संवादासाठी सर्व प्रभावी घटकांचा सहभाग आवश्यक असतो. दुसरीकडे, इस्रायलची भूमिकादेखील समजून घेणे आवश्यक आहे. इस्रायलने आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सीमावर्ती भागांमधून होणारे हल्ले, क्षेपणास्त्रांचा धोका आणि शत्रुत्वाची भावना यामुळे इस्रायल अनेकदा कठोर लष्करी कारवाया करतो. त्याच्या दृष्टीने या कारवाया राष्ट्रीय सुरक्षेचा भाग असतात; परंतु प्रत्येक लष्करी कारवाईचे परिणाम केवळ लक्ष्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर, पायाभूत सुविधांवर आणि समाजाच्या मानसिकतेवरही होतो. युद्ध जितके लांबते, तितकी द्वेषाची दरी खोल होत जाते. या संपूर्ण समीकरणात इराणची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव हा आजच्या मध्यपूर्वेतील सर्वात गंभीर भू-राजकीय प्रश्नांपैकी एक मानला जातो. लेबनानमधील संघर्षाला



व्यापक प्रादेशिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले, तर त्याचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. अशा परिस्थितीत केवळ लेबनान किंवा इस्रायल नव्हे, तर संपूर्ण प्रदेश अस्थिरतेच्या गर्तेत जाऊ शकतो. यामुळे ऊर्जा बाजारपेठा, जागतिक व्यापार आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. अमेरिकेने अनेक दशकांपासून मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. काही प्रयत्न यशस्वी ठरले, तर काही अपयशी; मात्र इतिहास सांगतो, की स्थानिक घटक तयार असतात, तेव्हाच बाह्य शक्तींची मध्यस्थी प्रभावी ठरते. कोणत्याही संघर्षाचा तोडगा बाहेरून लादता येत नाही. तो संबंधित समाजांनी आणि नेतृत्वाने स्वीकारला पाहिजे. अन्यथा करार कागदावर राहतात आणि वास्तवात संघर्ष कायम राहतो.

लेबनॉनची अंतर्गत परिस्थितीही हे संकट अधिक गंभीर बनवते. गेल्या काही वर्षांमध्ये देशाने आर्थिक दिवाळखोरी, चलनवाढ, बेरोजगारी आणि राजकीय अनिश्चिततेचा सामना केला आहे. अनेक कुटुंबांचे जीवन आधीच संकटात सापडले आहे. अशा वेळी संघर्ष तीव्र झाल्यास सामान्य नागरिकांची परिस्थिती बिकट होऊ शकते. युद्धाचा सर्वांत मोठा फटका युद्धाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्यांना बसतो. त्यांच्या घरांचे, रोजगाराचे, शिक्षणाचे आणि भविष्याचे नुकसान होते. युद्धाच्या बातम्यांमध्ये अनेकदा शस्त्रास्त्रे, रणनीती आणि राजकीय घोषणा यांवर भर दिला जातो; परंतु प्रत्येक संघर्षामागे मानवी वेदनांची एक मोठी कहाणी दडलेली असते. हजारो कुटुंबे विस्थापित होतात. मुलांचे शिक्षण खंडित होते. रुग्णालयांवर ताण वाढतो आणि संपूर्ण पिढी असुरक्षिततेच्या वातावरणात वाढते. त्यामुळे कोणत्याही संघर्षाचे मूल्यांकन करताना मानवी हक्क आणि मानवी जीवन केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. आजची सर्वांत मोठी गरज म्हणजे संयम आणि संवाद. संघर्षातील कोणताही पक्ष स्वतःला पूर्णपणे विजयी समजू शकत नाही. आधुनिक युद्धांमध्ये स्पष्ट विजयापेक्षा दीर्घकालीन नुकसान अधिक दिसून येते. आर्थिक संसाधने खर्ची पडतात, सामाजिक एकात्मता कमकुवत होते आणि भविष्यातील विकासाला मोठा धक्का बसतो. त्यामुळे युद्ध सुरू ठेवण्यापेक्षा संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरते.

मध्यपूर्वेच्या इतिहासात अनेक वेळा असे क्षण आले आहेत, जेव्हा परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली; परंतु त्याच इतिहासात संवाद, करार आणि राजनैतिक प्रयत्नांमुळे संघर्ष कमी झाल्याची उदाहरणेही आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय, प्रादेशिक शक्ती आणि स्थानिक नेतृत्व यांनी एकत्रितपणे शांततेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज लेबनानमधील संघर्ष हा केवळ सीमावाद किंवा लष्करी कारवायांचा विषय राहिलेला नाही. तो मध्यपूर्वेच्या भविष्यातील राजकीय व्यवस्थेची, प्रादेशिक संतुलनाची आणि जागतिक स्थैर्याची कसोटी बनला आहे. हा संघर्ष अधिक विस्तारल्यास अनेक देशांना परिणाम भोगावे लागू शकतात; परंतु संवाद आणि राजनैतिक प्रयत्नांना प्राधान्य दिले गेल्यास शांततेच्या नव्या अध्यायाला सुरुवात होऊ शकते. शांतता ही कधीही सहज मिळत नाही. ती संयम, विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी निर्माण करावी लागते. लेबनानमधील सध्याची परिस्थिती जगाला हेच स्मरण करून देते, की युद्धाची किंमत नेहमीच शांततेपेक्षा अधिक असते. म्हणूनच आज गरज आहे ती शस्त्रांच्या आवाजापेक्षा संवादाच्या भाषेला महत्त्व देण्याची. कारण अखेरीस कोणत्याही राष्ट्राचा खरा विजय रणांगणावर नव्हे, तर आपल्या नागरिकांना सुरक्षित, स्थिर आणि सन्मानाचे जीवन देण्यात असतो.

मध्यपूर्व हा प्रदेश गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष, राजकीय स्पर्धा, धार्मिक ध्रुवीकरण आणि जागतिक महासत्तांच्या हस्तक्षेपामुळे सतत अस्थिर राहिला आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, सीरिया युद्ध, इराण-सौदी अरेबिया स्पर्धा आणि विविध सशस्त्र संघटनांची उपस्थिती यामुळे या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न वारंवार अपुरे ठरले आहेत. अशा परिस्थितीत लेबनॉनमधील तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. हिजबुल्लाहने युद्धविरामाच्या प्रस्तावाला विरोध दर्शविल्याची माहिती समोर येत असताना आणि इस्रायलने लष्करी कारवाया सुरू ठेवण्याची भूमिका घेतल्याने संपूर्ण प्रदेशातील स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धविराम हा कोणत्याही संघर्षाच्या समाप्तीचा अंतिम उपाय नसला, तरी शांततेकडे जाणारा पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. संघर्षग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी, मानवी मदत पोहोचवण्यासाठी आणि राजनैतिक चर्चेसाठी वातावरण तयार करण्यासाठी युद्धविराम आवश्यक मानला जातो; मात्र संघर्षातील सर्व प्रमुख पक्ष चर्चेचा भाग नसतात किंवा कराराला त्यांची मान्यता नसते, तेव्हा अशा प्रयत्नांचे यश अनिश्चित बनते. लेबनॉनमधील सध्याच्या घडामोडी याच वास्तवाची आठवण करून देतात.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# शोषणमुक्त ग्राहकासाठी कायद्याची गरज

चंद्रकांत लोहाणा

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये ग्राहकाला दैवत म्हणून संबोधले जाते. त्यास राजाचीही उपाधी दिली जाते. असे असतानाही हा वर्ग उपेक्षित आहे. कोणतीही कंपनी आपले उत्पादन बाजारामध्ये आणताना त्यावर कमाल किरकोळ किंमत छापत असते. या मागचा शुद्ध हेतू असा की, ग्राहकाला ती विकत घेतली जाणारी वस्तू छापील किमतीपेक्षा जास्त दराने विकली जाऊ नये आणि विक्रेत्याकडून ग्राहकांची लूट होऊ नये. जर कोणी एखादा विक्रेता छापील किमतीपेक्षा जास्त किंमत लावून ती वस्तू विकत असेल तर त्या ग्राहकाला अन्यायाविरोधात दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार आहे. परंतु, प्रत्यक्षात उत्पादनावर छापली जाणारी कमाल किरकोळ किंमत हेच ग्राहकांना लुटण्याचे मुख्य शस्त्र बनले आहे. हे अनेक ग्राहकांना अजूनही माहीत नाही किंवा त्याबद्दल समाजामध्ये फारशी जनजागृतीही दिसून येत नाही. छोट्या किराणा दुकानांपासून तर मॉल्सपर्यंत सर्वत्र कमाल किरकोळ किमतीवर आकर्षक जाहिराती केल्या जातात; ग्राहक अशा जाहिरातीमध्ये अडकतात.

कंपनीमध्ये तयार होणाऱ्या कोणत्याही वस्तूवर एमआरपी किती टाकावी याबाबत भारतामध्ये असा कोणताही स्पष्ट कायदा नाही. एखाद्या वस्तूचे उत्पादन मूल्य जर १०० रुपये असेल आणि सर्व खर्च व नफा धरून ती वस्तू दुकानामध्ये १५० रुपयांमध्ये पोहोचत असेल तर ती किती कमाल किमतीमध्ये विकली जावी हा मुळात कायदाच नाही. त्यामुळे नफा धरून त्या वस्तूची किंमत १५० रुपये जरी असली तरी कंपनी त्या वस्तूवर कमाल किरकोळ किंमत चारशे रुपये, पाचशे रुपये छापण्यास मोकळी आहे. नेमका हाच झोल ग्राहकांच्या खिशावर डल्ला टाकण्यासाठी पुरेसा आहे. नेमकी हीच बाब हेरून अनेक ई-कॉमर्स विदेशी कंपन्या भारतामध्ये लूट करीत असल्याचे दिसून येत आहे. अमुक एखाद्या वस्तूवर ५० टक्के सूट किंवा एका वस्तूवर एक विनामूल्य असे प्रलोभन देऊन ग्राहकांच्या खिशाला कात्री लावली जाते, हे ग्राहकाच्या लक्षातही येत नाही. चारशे रुपये कमाल किरकोळ किंमत असणारी ती वस्तू कंपनीने ५० टक्के सवलत देऊनही ग्राहकाला विकली तर दोनशे रुपये वसूल होतात. त्याआधी विना सवलत देऊन विकलेल्या वस्तूंवर कंपनीने किती नफा कमविला असेल, त्याबाबत कल्पना न केलेलीच बरी.

मुळात सर्व खर्च आणि नफा धरून त्या वस्तूची किंमत फक्त १५० रुपये होते. म्हणजे त्या विक्रेत्याने पन्नास टक्के सूट देऊनही ग्राहकाच्या खिशामधुन पन्नास रुपये अधिक उकळले तरीही तो गुन्हा ठरत नाही. कारण की, स्पष्ट असा कायदा नाही. उत्पादित केलेल्या मालावर किंवा वस्तूवर कमाल किरकोळ किंमत किती असावी, उत्पादन मूल्यावर आधारित किंमत असावी असा स्पष्ट कायदा जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ग्राहक हा सतत भ्रामक संकल्पनेवर फसविला जाणार आहे. मुळात कोणताही व्यापारी असो वा कारखानदार स्वतःचा तोटा करून ती वस्तू कधीच विकणार नाही, हा साधा नैसर्गिक नियमही ग्राहकांच्या लक्षात येत नाही. या सर्व बाबीमागे कमाल किरकोळ किमतीची रचनाच फार मोठ्या प्रमाणामध्ये कारणीभूत आहे. एखाद्या वस्तूचा उत्पादन खर्च आणि त्यावर छापील किमतीचा काहीही संबंध नसतो. अनेकवेळा उत्पादन खर्चाच्या कितीतरी पटीने ती किंमत छापली जाते. आज शिकविले जाणारे अर्थशास्त्र आणि बाजारपेठेमध्ये अवलंबल्या जाणाऱ्या आर्थिक पद्धती ग्राहकांच्या हिताच्या नक्कीच नाहीत. या शास्त्रामध्ये ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवल्याचे दिसून येत नाही. खरं तर ग्राहकाभिमुख कल्याणकारी अर्थव्यवस्था हवी असेल तर त्यामध्ये ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवून आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. सरकारने कधीच ग्राहकाच्या हिताकडे लक्ष न दिल्याने ग्राहकांची लूट होत आली आहे. हे सर्व थांबवायचे असेल तर फक्त आणि फक्त उत्पादन मूल्यावर आधारित भाव हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. त्यासाठी आमच्या प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला तर हे सहज लक्षात येईल. त्यासाठी याज्ञवल्क्य स्मृती, ऋग्वेद, भास्कराचार्य, कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये उत्पादित मालाचे मूल्य कसे निर्धारित करावे आणि त्यानंतर ग्राहकाभिमुख वस्तूची किंमत किती असावी याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. त्यामुळे वस्तूवर निव्वळ कमाल किरकोळ किंमत छापणे ही ग्राहकांची शुद्ध फसवणूक असून, वस्तूवर उत्पादनमूल्यही छापल्यास भारताची अर्थव्यवस्था शोषणमुक्त आणि नक्कीच कल्याणकारी होऊ शकते. ग्राहक पंचायतनेही त्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी जनतेनेही दबावगट निर्माण केला तर यश हमखास मिळू शकते.

९८८१७१७८५६

## विशेष


# उष्णतावाढ अकस्मात नाही

अरविंद कडबे

इंग्रजांनी आपल्या देशावर साधारणतः २०० वर्ष राज्य केले. या कालावधीत त्यांनी आपले शैक्षणिक धोरण, सामाजिक धोरण, राजकीय धोरण, शेती विषयक धोरण व पर्यावरणीय धोरणात अत्यंत जाणीवपूर्वक आपल्या देशाचा घात केलेला आहे व त्याचा परिणाम आज आपला देश भोगत आहे. कारण इंग्रजांनी जो विकास केला त्याच विकासाच्या पावलावर आपले राज्यकर्ते आपल्या देशाला विकसित करण्याच्या उद्देशाने कामाला लागलेले आहेत असे स्वातंत्र्यानंतर आपल्याला जाणवत आहे.

महात्मा गांधीजींच्या विचारांनी जर आपण समृद्ध खेडी हा शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारला असता तर आजची परिस्थिती कदाचित वेगळी असती. इंग्रजांनी पर्यावरणाच्या दृष्टीने काय केलं की त्या काळात आपल्या देशात लाकडी कोळसा हे इंधन म्हणून आपल्याकडे वापरले जायचे व त्यासाठी आपलं जैविक जंगल होतं ते कंत्राटदारांना द्यायला सुरुवात केली व त्या ठिकाणी कमर्शियल जंगलाची सुरुवात झाली. आपल्या देशातले जैविक जंगल (४५-५० टक्के) हळूहळू कमी होण्यास सुरुवात झाली. त्यांच्या धोरणानुसार आपल्याकडे असे म्हणता येईल की त्यांनी सागवानाची शेती जे कमर्शियल वूड म्हणून सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरले जात होते त्याचा उपयोग करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर १९७० मध्ये आपल्या राज्यकर्त्यांनी फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (एफडीसीएम) ची स्थापना करून त्या माध्यमातून



इंग्रजांनी लागवड केलेल्या सागवानाची सर्वत्र लागवड केली व आपल्या देशातील जैवविविधता युक्त जंगले मोठ्या प्रमाणात समाप्त झाली. त्याचा दुष्परिणाम आज आपण मोठ्या प्रमाणात तापमान वाढीत दिवसेंदिवस अनुभवतो आहे. त्याचबरोबर आमच्या राज्यकर्त्यांनी शहरीकरण व त्यात मोठ्या प्रमाणात काँक्रिटीकरण करण्याचा घाट घातल्यामुळे तापमान वाढीत मदतच झाली. काँक्रिटीकरणाचे रस्ते करताना त्यात दुभाजकांमध्ये मोठी झाडे लावण्याऐवजी डेकोरेटिव्ह झाड लावण्याचा प्रकार अत्यंत त्रासदायक आहे.

त्याऐवजी त्यांनी इंग्रजांनी जसे रस्त्याच्या दुतर्फा मोठी झाडे लावली होती ती त्यांच्याकडून शिकण्याऐवजी लहान डेकोरेटिव्ह झाडे काय उपयोगाची? त्यामुळे सिमेंटचा रस्ता हा अधिक उष्णता शोषून घेतो रात्री उष्णता सोडण्याचे काम करतो व त्यामुळे गेल्या ५०-६० वर्षांत दिवस व रात्री यातील उष्णतेच्या प्रमाणाची दरी ही कमी झालेली आहे. पूर्वी जरी उष्णता होती व याच प्रकारचे तापमान होते तरी रात्री गाव, शहर थंड व्हायचे, आज असे नाही. याच्यात दिवसेंदिवस भर औद्योगीकरणाची झाली. तसेच एसीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला, विजेचा वापर वाढला व प्रदूषणात सातत्याने भर पडतच गेली व त्याचे परिणाम म्हणून मग अल निनोसारखे दुष्परिणाम होत आहे.

आज आपल्याकडे जैविक जंगल फक्त ८-९ टक्के आहे व लागवडीचे जंगल हे १२ ते १३ टक्के आहे. याविरुद्ध उष्णता वाढवणारे घटक, जसे मोठ्या प्रमाणात रासायनिक शेती, पेट्रोल व डिझेलच्या गाड्या वाढतच आहे. युद्धात मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी शस्त्रे ही पण उष्णता वाढवण्यास मदत करीत आहेत. या सर्वांचा दुष्परिणामच आपण अनुभवतो आहे. त्यासोबतच एकही नदी, नाला, ओढा, तलाव, जलाशय हे जैविक पाण्याने प्रवाहित नाही. त्यामुळे त्याचाही परिणाम होत आहे. प्रदूषणाची साखळी सातत्याने वाढत असताना त्याला सांभाळणारी जैविक साखळी मात्र कोलमडताना आपण अनुभवतो आहे व त्याचा परिणाम तापमानवाढीत होत आहे. आम्हाला याकरिता प्रयत्न करावे लागतील तरच भविष्य उज्ज्वल होईल, जीवन जगणं सुसह्य होईल.

७६५९०८४५५५
(ओलावा फाऊंडेशन)

### निष्क्रिय विरोधी पक्ष व निश्चयी पंतप्रधान

इराण-अमेरिका, इस्रायल युद्ध सुरू होऊन तीन महिने होऊन गेले आहेत. अजूनही युद्ध संपण्याची काहीच शक्यता दिसत नाही. या युद्धात शेकडो निरपराध लोक मारले गेले आहेत. लहान मुलांना सुद्धा निर्दयीपणे मारण्यास मागे पुढे पाहिले गेले नाही. तिन्ही देशांचे अतोनात नुकसान झाले आहे. पण सत्तेचा माज व स्वतःची असुरी इच्छा यापुढे कोणीच माघार घ्यायला तयार नाहीत. या युद्धामुळे आपल्या देशाचे सुद्धा नुकसान होत आहे. पण विरोधी पक्ष खासकरून मोदीविरोधी नेते जबाबदारीचे भान न ठेवता बेजबाबदारपणे वागत आहेत. त्यांच्या वागण्याचा त्यांना जरा सुद्धा पश्चात्ताप होत नाही. सर्वसामान्य जनतेला याची झळ कमीत कमी व्हावी म्हणून नरेंद्र मोदी दिवस रात्र मेहनत घेत आहेत. पण या नतद्रष्ट नेत्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नाही. कोरोना काळात सुद्धा मोदींनी अपार कष्ट घेऊन लोकांचे जीव वाचवले होते. आजही ज्या ज्या देशांकडून मदतीची शक्यता आहे त्या त्या देशात ते स्वतः जाऊन आले आहेत. त्यांनी आपल्या कोणत्याच मंत्र्यांना या करता पाठविले नाही.



विचार करा राहुल गांधी जर मोदींच्या जागी असते तर भारतीय जनतेची काय अवस्था झाली असती. त्यात भरीस भर म्हणून डोनाल्ड ट्रम्पसारखा राष्ट्राध्यक्ष काहीही म्हणतो व करतो आहे. पण नरेंद्र मोदींच्या धैर्याचे जितके कौतुक करावे तेवढे कमीच आहे. आपण नशीबवान आहोत म्हणून आपल्याला असे दूरदृष्टी लाभलेले पंतप्रधान मिळाले आहेत. त्यांचे भारतावर व जनतेवर अपार प्रेम आहे. व राष्ट्र प्रथम हे त्यांचे ब्रीद आहे. त्यांना अशा कुजक्या विचारांनी बरबटलेल्या नेत्यांची पर्वा करायची काहीच गरज नाही. म्हणूनच त्यांच्यावर जनतेचा अढळ विश्वास असल्यामुळेच भाजप एकापाठोपाठ एक राज्य जिंकत आहेत. ९ जूनला मोदी सरकारला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. सामान्य जनतेच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपप्रणीत रालोआ सरकारला खूप शुभेच्छा.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

## वाचक पत्रे

### हिंदूंनो, जागे व्हा

दि. ८ जूनच्या अंकातील अग्रलेख 'तरच टळेल देवस्थानांवरील बालंट' वाचला. महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेला हिंदूंच्या भावना दुखावणारा; देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम आराखडा हिंदू संघटनांनी विरोध केल्यामुळे स्थगित केला आहे. रद्द केला नाही. म्हणजे पुढे चालून हिंदू संघटनांचा विरोध शमविण्याइतपत मसुद्यात फेरफार करून परत हे विधेयक मंजूर करवून हा हिंदूंना जाचक कायदा महाराष्ट्रात लागू करण्याचे सरकारचे धोरण असू शकते. इतर धर्मीयांची देवस्थाने वगळून फक्त हिंदूंच्या देवस्थानांपुरता असा कायदा करणे म्हणजे देवस्थानांच्या स्वायत्ततेवर घाला घालणारा तर असेलच शिवाय करोडो हिंदूंच्या भावना दुखावणारा निश्चितच होईल. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात हिंदूंच्या देवस्थानांपेक्षा इतर धर्मीयांच्या धार्मिक स्थळांची एकूण संख्या लाखातच मोजावी लागेल. मोठ्या संख्येत असणाऱ्या मशिदी, चर्च, जैन मंदिरे, शिखांचे गुरु मंदिरे, बौद्धधर्म प्रार्थना स्थळे यांच्याकडे असणाऱ्या आर्थिक मालमत्तेची व अधिक्रमित स्थावर जमिनीची मोजदाद करण्याचे व त्यांच्या अधिकारावर अंकुश आणणारा कायदा करण्याची सरकारला काही गरज वाटत नाही; फक्त हिंदूंचीच देवस्थाने असला कायदा करण्यासाठी लक्ष्य करणे; करोडो हिंदूंना अन्यायकारक तर आहेच शिवाय घटनेने धार्मिक बाबतीत सर्व धर्मीयांना दिलेल्या समान अधिकाराचे हनन करणारे आहे. आपल्या आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक घटनादत्त अधिकारासाठी सदैव जागे राहून अशा प्रकारचे आपल्या अधिकारांचे हनन करणारे कायदे लागू होणार नाहीत यावर डोळ्यात तेल घालून सतत जागृत राहणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे, ७०५८९७५३७६

### रेल्वे रुळांवर स्वच्छता आवश्यक

आजच्या धावत्या युगात फिरण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. परंतु यामध्ये रेल्वेने फिरणारी मंडळी खूप जास्त आहेत. रेल्वेमध्ये अनेक ठिकाणी खाजगी कंत्राट दिलेले आहेत म्हणून त्यावर नियंत्रण आहे की नाही किंवा त्यावर काही संशोधन होते की नाही हे कळण्यास काहीही मार्ग नाही. काही काही गाड्यांमध्ये नंबरवर तक्रार केली असता प्रवाशांची असुविधा कमी होत नाही.

शिवाय एसीमध्ये जी पांघरण्याची सुविधा म्हणून पॅकेट दिलेले असते त्याचे कव्हर जमा करण्याची योग्य ती काळजी घेतली जात नाही म्हणून हे पॅकेट सर्वत्र खाली फेकून दिले जातात आणि स्वच्छता करणारी



माणसे ते रेल्वेच्या डब्याबाहेर ढकलून देतात म्हणजे कचरा कायम रेल्वे रुळावर असतो. तसेच प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, फळ खाऊन टाकलेली साले, नाश्ता केलेले डबे सर्रास झाडण्यात येतात तेही सुद्धा बाहेर ढकलून फेकले जातात. त्याचे कुठेही व्यवस्थापन नाही. त्याची विल्हेवाट लावण्याची योग्य सोय केल्यास कचरामुक्त भारत होण्यास खूप मदत होईल. मला वाटते रेल्वेमधून पडत असलेला कचरा ही फार मोठी गंभीर समस्या आहे. त्यामुळे प्रदूषण वाढतेच. याची योग्य ती दखल घेतल्यास नक्की सुधारणा होऊ शकते.

**डॉ. अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## दुर्मिळ 'संत जगमित्रनागा अभंग गाथे'चे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रकाशन



**परळी वैजनाथ :** वारकरी संप्रदाय, संत साहित्य आणि अध्यात्मिक अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या दुर्मिळ 'संत जगमित्रनागा अभंग गाथे'चे प्रकाशन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळीतील जगमित्र कार्यालयात संपन्न झाले.

संत साहित्याचे अभ्यासक व संत जगमित्र नागा चरित्र ग्रंथाचे लेखक ह.भ. प. ॲड. दत्तात्रय आंधळे संपादित या गाथेमध्ये संत जगमित्रनागा यांच्या दुर्मिळ अभंगांचा समावेश करण्यात आला असून त्यांचा सोपा भावार्थही देण्यात आला आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायातील अभ्यासक, कीर्तनकार, प्रवचनकार तसेच संत साहित्यप्रेमींसाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

संत साहित्याचे अभ्यासक व साहित्यिक ॲड. दत्तात्रय आंधळे यांनी या गाथेचे लेखन केले आहे. यापूर्वीही त्यांनी विविध चरित्रग्रंथ प्रकाशित केले असून संत साहित्य क्षेत्रात त्यांचे विशेष योगदान राहिले आहे. संत जगमित्रनागा यांचे जीवनकार्य, अध्यात्मिक विचार आणि अभंग साहित्याचा व्यापक प्रसार व्हावा या उद्देशाने हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.परळी वैजनाथ येथील संत जगमित्रनागा यांच्या चरित्रासह त्यांच्या अभंगांचा अभ्यासपूर्ण आढावा या गाथेत घेण्यात आला आहे. त्यामुळे संत साहित्य क्षेत्रातील ही एक दुर्मिळ आणि अभ्यासपूर्ण ग्रंथसंपदा ठरणार असल्याचे मत आ धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

या प्रकाशन कार्यक्रमास युवक नेते अजय मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष अयुब खान पठाण, पत्रकार प्रा. रविंद्र जोशी, गोविंद केंद्रे, सदाशिव देशपांडे, बाबुराव रुपनर यांच्यासह अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## खोडवा सावरगाव येथील पाणंद रस्त्याचे निकृष्ट काम;सखोल चौकशी करण्याची ग्रामस्थांची मागणी

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी :** तालुक्यातील खोडवा सावरगाव येथील शेतकऱ्यांनी पाणंद रस्त्याच्या कामात झालेल्या कथित अनियमिततेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती परळी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करत चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खोडवा सावरगाव येथील शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा पाणंद रस्ता दत्तात्रय मानाजी दहिफळे यांच्या शेतापर्यंत करण्यात आला आहे. या रस्त्याचे काही ठिकाणी १० फूट तर काही ठिकाणी २० फूट रुंदीचे काम करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यावर मोठे दगड व खडी टाकण्यात आली असून मुरुमाचा वापर अत्यल्प प्रमाणात करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

रस्त्याच्या कामात अंदाजपत्रकानुसार (इस्टिमेटप्रमाणे) काम झाले नसून संबंधित कामाची तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच रस्त्यालगत आवश्यक ठिकाणी नाली बांधण्यात आलेली नसल्यामुळे पावसाळ्यात शेतात पाणी साचून शेतीचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी संबंधित कामाची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून चौकशी करावी तसेच रस्त्याचे काम दर्जेदार व नियमानुसार करून घ्यावे, अशी मागणी केली आहे. ही तक्रार जिल्हाधिकारी बीड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच ग्रामीण पोलीस ठाणे परळी यांनाही पाठविण्यात आली आहे.

निवेदनावर दत्तु नारायण दहिफळे, वैजनाथ लक्ष्मण दहिफळे, दत्तात्रय मानाजी दहिफळे, सुनील गणपती दहिफळे यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामस्थांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. खोडवा सावरगाव येथील पाणंद रस्त्याचे निकृष्ट

काम;सखोल चौकशी करण्याची ग्रामस्थांची मागणी

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी :** तालुक्यातील खोडवा सावरगाव येथील शेतकऱ्यांनी पाणंद रस्त्याच्या कामात झालेल्या कथित अनियमिततेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती परळी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करत चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खोडवा सावरगाव येथील शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा पाणंद रस्ता दत्तात्रय मानाजी दहिफळे यांच्या शेतापर्यंत करण्यात आला आहे. या रस्त्याचे काही ठिकाणी १० फूट तर काही ठिकाणी २० फूट रुंदीचे काम करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यावर मोठे दगड व खडी टाकण्यात आली असून मुरुमाचा वापर अत्यल्प प्रमाणात करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

रस्त्याच्या कामात अंदाजपत्रकानुसार (इस्टिमेटप्रमाणे) काम झाले नसून संबंधित कामाची तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच रस्त्यालगत आवश्यक ठिकाणी नाली बांधण्यात आलेली नसल्यामुळे पावसाळ्यात शेतात पाणी साचून शेतीचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी संबंधित कामाची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून चौकशी करावी तसेच रस्त्याचे काम दर्जेदार व नियमानुसार करून घ्यावे, अशी मागणी केली आहे. ही तक्रार जिल्हाधिकारी बीड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच ग्रामीण पोलीस ठाणे परळी यांनाही पाठविण्यात आली आहे.

निवेदनावर दत्तु नारायण दहिफळे, वैजनाथ लक्ष्मण दहिफळे, दत्तात्रय मानाजी दहिफळे, सुनील गणपती दहिफळे यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामस्थांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



## फोन करुन सांगितलं'कार्यक्रम ओके'! प्रियकराच्या मदतीने नवऱ्याला संपवलं

**बीड :** प्रेमसंबंधांमध्ये अडसर ठरणाऱ्या पतीची पत्नीनेच प्रियकराच्या मदतीने गळा आवळून हत्या केली आणि त्यानंतर हा अपघात असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांच्या तांत्रिक तपासामुळे आणि आरोपींनी एकमेकांना केलेल्या एका 'कोडवर्ड' कॉलमुळे या गुन्ह्याचा पर्दाफाश झाला आहे. लिंबागणेश परिसरात घडलेल्या एका थरारक हत्याकांडाचा पोलिसांनी अवघ्या 5 दिवसांत छडा लावला आहे.

**अपघाताचा रचला होता बनाव**

किरण सोनवणे यांचा मृतदेह काही दिवसांपूर्वी रस्त्याच्या कडेला संशयास्पद अवस्थेत आढळून आला होता. त्यांच्या अंगावर दुचाकी पडलेली होती, ज्यामुळे प्रथमदर्शनी हा रस्ते अपघात असावा असे वाटत होते. मात्र, मृतदेहाची स्थिती पाहून नेकनूर पोलिसांना संशय आला. त्यांनी तातडीने मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदन अहवालात किरण यांचा मृत्यू अपघाताने नाही, तर गळा आवळल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

**प्रेमसंबंध आणि पतीचा जाच**

पोलिसांनी मृताची पत्नी प्रियंका सोनवणे हिच्या हालचालींवर लक्ष ठेवले. तपासात समोर आले की, प्रियंकाचे दशरथ परदेशी नावाच्या तरुणासोबत प्रेमसंबंध होते. पती किरण हा आपल्या दोघांच्या प्रेमात अडसर ठरत आहे आणि तो आपल्याला जाच देत आहे, असा प्रियंकाचा समज होता. याच कारणातून तिने प्रियकर दशरथ आणि त्याचा मित्र धीरज येडे यांच्यासोबत मिळून पतीच्या हत्येचा कट रचला.

**'कार्यक्रम ओके' आणि पनवेल कनेक्शन**

घटनेच्या रात्री आरोपींनी किरण यांचा गळा आवळून खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह रस्त्याच्या कडेला दुचाकीखाली दाबून टाकला. हत्या यशस्वी झाल्यानंतर आरोपींनी एकमेकांना फोन केला आणि 'कार्यक्रम ओके'असा निरोप दिला. हा तांत्रिक पुरावा पोलिसांच्या हाती लागताच आरोपींचे बिंग फुटले. गुन्हा केल्यानंतर तिन्ही आरोपी फरार होऊन पनवेल येथे लपून बसले होते. पोलिसांनी आरोपींचे लोकेशन शोधले आणि पनवेलमध्ये सापळा रचून पत्नी प्रियंका, प्रियकर दशरथ परदेशी आणि त्याचा मित्र धीरज येडे या तिघांना बेड्या ठोकल्या.

## धारूरमध्ये एकल महिलांसाठी आरोग्य शिबिर; 70 महिलांची तपासणी

**बीड, :** मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्था, अंबाजोगाईच्या वतीने धारूर येथे एकल महिलांसाठी आरोग्य शिबिर व मार्गदर्शन पार पडले. एकल महिलांच्या आरोग्याच्या समस्या, त्यांचे हक्क व स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने सदर उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरात ७० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. रमा पांडे यांनी महिलांशी संवाद साधत एकल महिलांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्यांचा लाभघेण्याची प्रक्रिया याबाबत माहिती दिली. तालुका आरोग्य विभागाचे समुपदेशक प्रेमानंद स्वामी यांनी क्षयरोग (टीबी), व्यसनाधीनता, गुप्तरोग, गर्भाशयाशी संबंधित आजार व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांवर माहिती दिली. शहर प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. खडसे यांनी आरोग्य पथकासह उपस्थित महिलांची आरोग्य तपासणी केली.

## मान्सूनपूर्व पावसाने मांजरा धरणात ९.६९७ दलघमी पाण्याची वाढ

**बीड :** लातूर, अंबाजोगाई, केज, कळंब व धारूर या शहरांसह शेकडो गावांची पिण्याच्या पाण्याची गरज भागविणारे तसेच पाच तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरणाच्या पाणीसाठ्यात मान्सूनपूर्व पावसामुळे लक्षणीय वाढ झाली आहे. केज व कळंब तालुक्यासह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे नदी-नाले खळखळून वाहू लागले. त्यामुळे मांजरा धरणात दखलपात्र पाण्याची आवक झाली असून धरणाच्या पाणीसाठ्यात ९.६९७ दलघमी वाढ नोंदविण्यात आली आहे. यंदाच्या हंगामातील हा पहिलाच येवा आहे.

मांजरा धरणाची एकूण साठवण क्षमता २२४.०९३ दलघमी आहे धरणात ७७.८८९ दलघमी एवढा उपयुक्त पाणीसाठा होता. झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ होऊन उपयुक्त पाणीसाठा ८७.५८६ दलघमी इतका झाला असून तो एकूण क्षमतेच्या २२.८६ टक्के आहे. मृतसाठा वगळता एका दिवसात ९.६९७ दलघमी पाणीसाठा वाढला आहे.

## जावयासाठी अंगठी लपवलेला "धोंडा" मांजराने खाल्ला; पुढं जे घडलं.. जीव गेला, ऑपरेशन केलं अन्...

**बीड :** जावयासाठी सोन्याची अंगठी असलेला धोंडा मांजरीने खाल्ल्याची घटना बीडमधून समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही अंगठी बाहेर काढण्यासाठी मांजरीला उलटीचे औषध दिले ज्यामुळे तिचा मृत्यू झाला. शेवटी जावयाला कपड्याच्या अहेरावर समाधान मानावे लागले. या विचित्र घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

धोंड्याची अंगठी मांजरीच्या पोटात...

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सध्या अधिकमास सुरू आहे आणि या अधिकमासात जावयाचा मोठा मान असतो. प्रत्येक सासरा आपल्या जावयाला सोन्याच्या स्वरूपात काहीतरी वस्तू देत असतो. मात्र बीडमध्ये आपल्या जावयासाठी केलेला धोंडा मांजरीने खाल्ल्याचा प्रकार समोर आला आहे. या विचित्र घटनेची जिल्हाभरात चर्चा होत आहे.

धोंड्याच्या महिन्यासाठी आलेल्या जावयाला सरप्राईज देण्यासाठी अंगठी धोंड्यात ठेवून तो इतर धोंड्यांसोबत ठेवला. मात्र स्वयंपाकानंतर आवराआवरी सुरू असताना घरात आलेल्या मांजरीने नेमका तोच धोंडा स्पष्ट केला त्यामुळे घरच्यांची धांदल उडाली. मग काय अंगठी परत मिळावी म्हणून मांजरीला चक्क चार दिवस घरात बांधून ठेवण्यात आले.

तसेच विष्ठेद्वारे अंगठी बाहेर पडेल अशी अपेक्षा होती, मात्र तसे न झाल्याने तिला पशुवैद्यकाकडे नेऊन उलटीसाठी औषधे देण्यात आले परंतु मांजरीला उलटी झाली नाही उलट त्यात मांजरीचा जीव गेला. त्यानंतर मृत मांजरीच्या पोटावर शस्त्रक्रिया करून सोन्याची अंगठी बाहेर काढण्यात आली. या प्रकरणाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.

## वादळी वाऱ्यामुळे शेतातील सौर पॅनेलचे नुकसान

**बीड :** येथील शेतकरी संकेत युवराज डोंगर यांच्या गट क्रमांक ३३ मधील शेतात बसविण्यात आलेले सीआरआय कंपनीचे पाच एचपी क्षमतेच्या पंपासाठीचे सौर पॅनेल जोरदार वाऱ्यामुळे उडून जाऊन त्याचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की सौर पॅनेलची रचना विस्कळीत झाली असून सौर पॅनेलचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीमुळे शेतातील तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून डोंगर यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. याशिवाय वादळी वाऱ्यामुळे त्यांच्या शेतातील दोन ते तीन लिंबाची झाडेही उन्मळून पडली. नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना अशा अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याचा फटका बसत असल्याने नुकसानग्रस्तांना तातडीने मदत व पंचनामा करण्याची मागणी होत आहे.

## चकलांबा ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध अभियानात अव्वल

**बीड :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत गेवराई तालुक्यातून सर्वाधिक गुण मिळवून सर्वप्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी चकलांबा ग्रामपंचायत सरपंचाचे पत्र पाठवून विशेष अभिनंदन केले आहे. यासंदर्भात अभिनंदन पत्रात आमदार विजयसिंह पंडित यांनी म्हटले आहे, ग्रामपंचायतीच्या कामकाजात स्पर्धात्मक गुणवत्ता वाढविण्यासाठी महायुती सरकारने हे अभियान सुरू केले आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीचे मोठे योगदान आहे. सुशासन व प्रशासन, सक्षम प्रशासन, पाणी व पर्यावरण व्यवस्थापन, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, डिजिटल सेवा, लोक सहभाग व आर्थिक नियोजन व महसूल वाढ, हे या अभियानातील प्रमुख घटक आहेत.

## आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात 10 जूनपासून बीड-मुंबई लॉंग मार्चची घोषणा

**बीड :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यातील आंबेडकरी पक्ष व संघटनांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा या मुख्य घोषणेसह येत्या १० जूनपासून बीड ते मुंबई असा ऐतिहासिक पायी लाँग मार्च काढण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली.

उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा अहवाल सरकारने तत्काळ सार्वजनिक करावा, अशी मागणी करत सरकार जनतेवर हा निर्णय लादण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच सूचना व हरकती सादर करण्याची मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढवून मिळावी आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ जातींची भूमिका जाणून घेण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी मागणी करण्यात आली. या लॉंग मार्चमध्ये कंत्राटी नोकरभरती, खासगीकरण आणि जातनिहाय जनगणना या मुद्द्यांवरही सरकारला जाब विचारला जाईल. हा लढा कोणत्याही विशिष्ट समाजाच्या विरोधात नसून संविधानिक आरक्षणाच्या संरक्षणासाठी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पत्रकार परिषदेला सिद्धार्थ शिनगारे, अजय सरवदे, ॲड. राजेश शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सैनिकांच्या पाल्यांसाठी वसतीगृह प्रवेश सुरु

**बीड :** बीड जिल्ह्यातील आजी, माजी सैनिक, युद्ध विधवा आणि विधवांच्या पाल्यांसाठी येत्या शैक्षणिक वर्षात वसतीगृहात प्रवेशासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. बीड व अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतीगृहात प्रवेशासाठी पात्र व इच्छुकांनी ता. ३० जूनपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर प्रवेश प्राधान्यक्रमानुसार असून पदानुसार अल्प शुल्कात निवासाची सोय असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे (निवृत्त) यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांनी जगाची गरज ओळखून करिअर निवडावे – प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांचे प्रतिपादन

### नेकनूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा संपन्न

**बीड (प्रतिनिधी):** आज जागतिक स्तरावर तंत्रज्ञान आणि रोजगाराची समीकरणे वेगाने बदलत आहेत. अशा काळात विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक वाटांवर न चालता, जगाची नेमकी काय गरज आहे' हे ओळखून आपल्या करिअरची दिशा निश्चित करावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.



नेकनूर येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ तथा करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम सोमवार, दि.८ रोजी डॉ.अब्दुल कलाम संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, नेकनुर येथे उत्साहात पार पडला.

पुढे बोलताना डॉ. बांदल म्हणाले की, दहावी आणि बारावीनंतर केवळ मेडिकल किंवा इंजिनिअरिंग या क्षेत्रांचा विचार न करता माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉ, मीडिया, फॅशन डिझायनिंग, गव्हर्नमेंट बँकिंग, सी.ए., इन्शुरन्स स्किल्स, टॅली, जीएसटी, एमपीएससी, यूपीएससी, हेल्थकेअर आणि नर्सिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या सुवर्णसंधी उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या आधुनिक कौशल्यांकडे वळावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डी. डी. राऊत यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, मुलांनी नवनवीन करिअरच्या संधींकडे वळावे. पारंपारिक संधींपेक्षा आधुनिक संधींचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी आपले भवितव्य उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## गेवराई बसस्थानक परिसरात नो पार्किंग झोन सुरु

**बीड :** गेवराई येथील बसस्थानक परिसरात २०० मीटर नो पार्किंग झोन सुरू करण्यात आला असून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राज्यातील बसस्थानकांचे २०० मीटर परिसरात होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश परिवहन यांनी दिले आहेत. या मोहिमेअंतर्गत १५ जून २०२६ दरम्यान संयुक्त अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशावरून ही मोहीम हाती घेतली आहे.

## परळीत खेत बचाव अभियान; जिल्हाधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**बीड :** तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वै. येथे खेत बचाव अभियान आणि किसान गोष्टी अंतर्गत भव्य शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांच्या नियोजनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. निसर्गाच्या लहरीपणावर आणि येणाऱ्या संकटांवर योग्य नियोजनातून मात करून शेतकऱ्यांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाईचे वरिष्ठ शास्त्रज्ञ पंखे यांनी प्रास्ताविकातून शेतकऱ्यांना 'एल निनो'च्या संभाव्य धोक्यांबद्दल जागरूक केले. त्यांनी कमी पाऊसमानाचा विचार करून सरी व वरंबा पद्धत, बीजप्रक्रिया आणि घरगुती बियाण्यांची उगवण क्षमता तपासूनच पेरणी करण्याचा सल्ला दिला. जमिनीत किमान १०० मिमी पाऊस झाल्यावरच कमी कालावधीच्या पिकांची निवड करण्याचे त्यांनी सुचवले.

त्यानंतर उप कृषी अधिकारी ए. जी. गाडे यांनी एकात्मिक शेती व्यवस्थापन, हुमणी अळी नियंत्रण, सापळा पिके, आंतरपिके, चिकट व प्रकाश सापळ्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी निंबोळी व दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत सांगत, आर्थिक नुकसान पातळीनुसार रासायनिक औषधांची लेबल क्लेमप्रमाणे फवारणी कशी करावी, यावर प्रकाश टाकला.

या सोहळ्याला भा.प्र.से. प्रशिक्षणार्थी अधिकारी गुप्ता, अतिरिक्त जिल्हाधिकारी धार्मिक यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात पोकरा समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी सोयाबीन बीजप्रक्रिया आणि घरगुती बियाणे उगवण क्षमतेचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच काही शेतकरी गटांनी दशपर्णी अर्क व जीवामृताचे प्रात्यक्षिक सादर करत त्याचे महत्त्व पटवून दिले. याच वेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप झाले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी २.४ मिलीमीटर पावसाची नोंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : जिल्ह्यात ९ जून रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी २.४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये जळकोट तालुक्यात सर्वाधिक १९.५ मिलीमीटर, तर निलंगा, देवणी, शिरुर अनंतपाळ तालुक्यात सर्वात कमी 0.0 मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- २.९, औसा- १.२, अहमदपूर- ३.४, निलंगा- 0.0, उदगीर- ४.२, चाकूर- 0.३, रेणापूर- १.0, देवणी- 0.0, शिरूर अनंतपाळ- 0.0 आणि जळकोट- १९.५ मिलीमीटर.



# विविध वृत्त...

## वाहतुकीस अडथळा; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : येर्थील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक रस्त्यावर वाहतूकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ जून रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास एमएच २४, एटी 00१0 या क्रमांकाच्या ऑटोरिक्षाचालकाने प्रवासी भरण्याच्या उद्देशाने रस्त्यामध्ये अत्यंत बेशिस्तपणे ऑटोरिक्षा उभी केली. यामुळे इतर वाहनांच्या वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होऊन लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला.

## रहदारीस अडथळा केल्याने चालकावर गुन्हा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्त्याच्या मध्यभागी ऑटोरिक्षा उभी करून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या रिक्षा चालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे . एमएच२४ एटी0६५७ या क्रमांकाच्या ऑटोरिक्षा चालकानी ऑटोरिक्षा चालू स्थितीत रस्त्यामध्ये उभी केली होती . यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असल्याने पोलीस अंमलदार फुलचंद अंकुश यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस शिपाई बिराजदार करीत आहेत

## मराठा सेवा संघाच्या मुख्य प्रवक्तेपदी भानुसे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : मराठा सेवा संघाच्या मुख्य प्रवक्तेपदी प्रसिद्ध व्याख्याते . कवी - लेखक . समिक्षक, राजकीय घडामोठीचे अभ्यासक डॉ . शिवानंद भानुसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे

या निवडीबद्दत भानुसे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे

## रेणापूर नाका येथून दुचाकीची चोरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : येथील नवीन रेणापूर नाका येथे घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी पळवून नेल्याची घटना घडली आहे .

औदुंबर शिवाजी व्यवहारे यांच्या फिर्यादीवरून त्यांची एम एच२४ एके४४४७ या क्रमांकाची दुचाकी घरासमोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली आहे .

अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत

## गांधीनगर परिसरात पथदिवे बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि .९ जून : शहरातील गांधीनगर परिसरातील पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे हा परिसर अंधाराने व्यापला असल्याने रात्रीच्या वेळी, नागरिक महिला आहि वाहनचालकांन ये - जा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे अपघात तसेच चोरींच्या घटना घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली असत्याने संबंधित विभागाने यावर उपाय योजना करण्याची मागणी नागरिकातून होत आहे

## ज्योतिषी जोशी यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा


लातूर दि .९ जून : चापोली येथील ज्योतिषी नागेशदेव जोशी (चापोलीकर) यांनी ज्योतिषशास्त्रातील अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल त्यांचा पनवेल येथे पदवी व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

पनवेलच्या स्वामी समर्थ ज्योतिष केंद्रात आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात त्यांनी ज्योतिष पंडित, वास्तू पंडित, रत्न पंडित तसेच कृष्णमूर्ती ज्योतिषशास्त्र हे अभ्यासक्रम पूर्ण केले. याबद्दल त्यांना पदवी व पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी पनवेलचे महापौर नितीन पाटील, ज्योतिष केंद्राचे संचालक नक्षत्र सम्राट, रायगड भूषण डॉ. गिरीश पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कृष्णमूर्ती ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक्रम कमी वयात पूर्ण करणारे ते पहिले विद्यार्थी ठरले आहेत. या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

# लातूर उस्मानाबाद बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात एकेकाळचे सहकारीच आता परस्परांविरुद्ध आमने - सामने !





तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ९ जून : होऊ घातलेल्या लातूर - उस्मानाबाद - बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदार संघात भाजप - महायुतीकडून कडून माजी राज्यमंत्री बसवराज पाटील मुरूमकर आणि काँग्रेस - महाविकास आघाडीकडून महेश देशमुख काही वर्षांपूर्वी एकाच राजकीय पक्षात कार्यरत असलेले एकेकाळचे सहकारीच आता परस्परांविरुद्ध आमने - सामने उभे आहेत. या निवडणुकीत कोण बाजी मारणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

लातूर - उस्मानाबाद - बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदार संघाच्या निवडणुकीचीधामधूम आता चांगलीच वाढली आहे. महायुतीकडून भाजपचे लातूर जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर तर काँग्रेस - महाविकास आघाडीकडून महेश देशमुख आखाड्यात उतरले आहेत. या निवडणुकीसाठी भाजपकडून अनेक नावांची चर्चा झाली. मात्र भाजप नेतृत्वाने पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी राज्यमंत्री तथा विद्यमान भाजप लातूर जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांच्यावर विश्वास दर्शवला. बसवराज पाटील एक अनुभवी राजकीय नेते असून त्यांचे संघटन कौशल्य चांगले असल्याचा फायदा सद्यस्थितीत भाजपलाही होत असल्याचे निदर्शनास येत आहे. मध्यंतरीच्या काळात काँग्रेससह अनेक राजकीय पक्षातील नेतेमंडळींनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटील यांचाही समावेश होता. भाजपनेही त्यांच्या संघटन कौशल्याचा आणि नेतृत्व क्षमतेचा पुरेपूर सन्मान करत त्यांच्यावर भाजपच्या लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली . केवळ जिल्हाध्यक्ष पदावरचन थांबता त्यांना स्थानिक स्वराज्य मतदार संघातून अधिकृत उमेदवारीहीबहाल केली. पाटील यांनी आपल्या प्रचारास शिस्तबद्ध सुरुवातही केली आहे.या मतदार संघातूनकाँग्रेसनेमहाविकास आघाडीकडून कवठा जिल्हा परिषद मतदार संघातून राज्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी झालेले युवा नेते महेश देशमुख यांना मैदानात उतरवले आहे. महेश देशमुख यांचे संघटन कौशल्यहीवाखाणण्याजोगे आहे. एक धडाडीचे युवक नेतृत्व म्हणून ते ओळखले जातात. महेश देशमुख यांच्या विजयासाठी काँग्रेस तसेच महाविकास आघाडीचे प्रमुख नेते प्रयत्नशील आहेत. महेश देशमुख यांच्यावरहीउमेदवारी परत घेण्यासाठी भाजपच्या मंडळींकडून दबाव आणला गेल्याचा आरोप खुद्द महेश देशमुख यांनीच नुकत्याच लातुरात पार पडलेल्या काँग्रेस महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत केला होता. त्यामुळे भाजपालाया मतदार संघातूनहीआपला उमेदवारबिनविरोध निवडून आणायचा असल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून केला गेल्याचे पाहायला मिळाले.या निवडणुकीतीलमहायुती व महाविकास आघाडीचे दोन्ही उमेदवार काही वर्षांपूर्वी एकाच राजकीय पक्षात कार्यरत राहिलेले आहेत. त्यामुळे या दोघांनाही या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील मतदार चांगलेचजाणून आहेत. या मतदार संघावर अनेक वर्षे भाजपचे वर्चस्व राहिले आहे. यावेळीहीभाजप हा मतदार संघ आपल्याच ताब्यात राहावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार, हे निश्चित आहे. काँग्रेसचे महेश देशमुख बसवराज पाटील यांच्यासमोर कितपत तग धरतात यावरही या मतदार संघाचानिकाल अवलंबून असणार आहे. एकंदर परिस्थितीतया मतदार संघातएकेकाळचे सहकारीचआता परस्परांविरुद्ध आमने - सामने आल्याने प्रत्यक्षात काय होणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## तांत्रिक विश्लेषणाद्वारे पोलिस दलाने शोधले हरवलेले १० मोबाईल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : लातूर शहरातील गजबजलेल्या बसस्थानक परिसर, गंजगोलाई, मार्केट यार्ड, कापड लाईन, सराफ लाईन तसेच इतर गर्दीच्या ठिकाणी अनेक नागरिकांचे मोबाईल फोन हरवले होते. याबाबत विविध नागरिकांनी गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत लातूर जिल्हा पोलीस दलाने हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी विशेष मोहीम राबविली.

सदर पथकाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यास सुरुवात केली. यामध्ये विशेषतः केंद्र शासनाच्या सीइआयआर (सेंट्रल एक्यूपमेंट आयडेटीटी रजीस्टर) प्रणालीचा प्रभावी वापर करण्यात आला. या मोहिमेत पोलीस अंमलदार योगेश चिंचोलीकर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा, तांत्रिक विश्र्लेषण आणि माहिती संकलनाच्या माध्यमातून हरवलेल्या मोबाईलचा मागोवा घेतला.

सखोल तांत्रिक तपास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विविध ठिकाणी हरवलेले १० मोबाईल फोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण किंमत अंदाजे २ लाख रुपये इतकी आहे. त्यानंतर संबंधित मोबाईल धारकांचा शोध घेऊन सर्व मोबाईल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले. हरवलेला मोबाईल परत मिळाल्यानंतर अनेक नागरिकांनी गांधी चौक पोलिसांचे आभार व्यक्त केले. नागरिकांनी हरवलेल्या मोबाईल बाबत पोलीस ठाण्यात अथवा सीइआयआर पोर्टलवर नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## क्लासेसचे फलक हटवण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि .९ जून शहरातील नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्र्वभूमीवर आरसीसी क्लासेसचे फलक, जाहितात साहित्य तात्काळ हटविण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँगस पक्ष (शरदपवार ) युवक आघाडीचे प्रदेश सहसचिव प्रदिप लोंढे यांनी मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे

संबंधित प्रकरणामुळे लातूरच्या शैक्षणिक प्रतिमेला धक्का च दावाही सदर निवेदनात करण्यात आला असून चौकशी पूर्ण होईपर्यंत क्लासेस चे प्रचार साहित्य सार्वजनिक ठिकाणावरून हटवण्याचीही मागणी निवेदनातून केली आहे

## अतिरिक्त फीस किंवा शैक्षणिक साहित्याची सक्ती केल्यास कारवाई : शिक्षणाधिकारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : १५ येत्या जून रोजी राज्यभरातील शाळा सुरु होणार आहेत. नवा वर्ग, नवे साहित्य आणि नवीन ॲडमिश यासाठी विद्यार्थी आणि पालकांची धावपळ सध्या सुरु झाली आहे. शहरातील काही शाळांमधून अतिरिक्त फीस आणि शैक्षणिक साहित्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी अतिरिक्त फीस किंवा शैक्षणिक साहित्याची सक्ती करणाऱ्या शाळांवर कारवाईचा इशारा दिला आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष आठ दिवसांनंतर सुरु होणार आहे. त्यानिमित्त बाजारात कृमिक पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, आले आहेत. बालवाडी ते पहिली आणि पुढे आपल्या पाल्यांना प्रवेश देण्यासाठी शाळांमध्ये गर्दी करीत आहेत. त्याचाच फायदा घेत कांही शिक्षण संस्था व शाळा पालकांकडून अधिकची फीस वसुलण्यासाठी प्रयत्न करतात, तसेच वह्या, पुस्तके, गणवेश किंवा शूज, असे शैक्षणिक साहित्य शाळामधूनच खरेदी करावेत किंवा ठराविक दुकानातूनच घेण्याची सक्ती देखील करीत आहेत. त्यामुळे पालकांची अडचण होत आहे.

काही पालकांनी जिल्हा शिक्षण परिषदेच्या प्राथमिक अधिकारी तृप्ती अंधारे यांच्याकडे या गोष्टीची तक्रार केली होती. त्याची दखल घेत शिक्षणाधिकारी अंधारे यांनी अतिरिक्त फीस किंवा शैक्षणिक साहित्यासाठी सक्ती करणाऱ्या शाळांवर थेट कारवाईचा ईशारा दिला आहे.

## श्री संतोषीमाता मंदिरास भक्ताकडून इन्व्हेटर बॅटरी दान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : लातूरच्या हत्ते नगरातील श्री संतोषीमाता देवस्थान मंदिराला वसमत येथील संतोषीमाता भक्त संतोष दिगंबरराव हादवे यांनी २२0 ॲम्पाएर इन्व्हेर्टर बॅटरी अर्पण केली.त्याबद्दल श्री संतोषीमाता देवस्थानचे मोहन महाराज यांनी त्यांचे पुष्पहार घालून आभार व्यक्त केले.

लातूर येथील हत्ते नगरातील रोड नंबर ४ वर उभारण्यात आलेल्या संतोषीमाता मंदिरास भाविक भक्त आपल्या परिने मदत करत आहेत,इन्व्हर्टर बॅटरीची आवश्यकता होती.ही निकड लक्षात घेवून वसमत,जि.हिंगोली येथील भाजपाचे कार्यकर्ते संतोष हादवे यांनी आपली सहचारिणी जयश्री हावदे यांच्या समवेत येवून या २२0 अम्पाएरची इन्व्हर्टर बॅटरी मातेचरणी अर्पण केली.यावेळी देवस्थानचे प्रमुख मोहन महाराज यांनी त्यांचे पुष्पहार व प्रसाद देवून स्वागत केले.यावेळी अनेक भाविक उपस्थित होते.

## आज गुणवंतांचा यशोशिखर सन्मान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : ज्ञान, गुणवत्ता आणि यशाची उज्वल परंपरा जपणार्या जेएसपीएम शिक्षण संस्थेतर्फे आज दि. १० जून २०२६ रोजी लातूर पॅटर्न यशोशिखर सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा सकाळी १० वाजता जे.एस.पी.एम. शैक्षणिक संकुल, कळंब रोड, एम.आय.डी.सी., लातूर येथे संपन्न होणार आहे. या भव्य सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून परिश्रमांना सलाम, यशस्वींचा सन्मान हे ध्येय समोर ठेवून लातूर एस.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये १०० टक्के गुण मिळवून यश संपादन करणार्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त सर्जिकल सोसायटी ऑफ लातूरतर्फे गुगळे हॉस्पिटल, लातूर येथे दि. ७ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात लातूरकरांनी उत्स्फुर्त सहभाग घेत रक्तदान केले. या शिबीरात विक्रमी रक्तदान करणारे रक्तदाते यांचा अनसंग हिरोज आ-फ लातूर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रक्तदान करणाऱ्यां रक्तदात्यांना हेल्मेट भेट देण्यात आले.

रक्तदान शिबीरास खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. आनंद कामत, डॉ. राजेंद्र गणेरीवाल, डॉ. दीपक गुगळे, डॉ. अभिजित रायते, डॉ. निखिल काळे, डॉ. गणेश स्वामी, ज्येष्ठ सर्जन डॉ. डी. एन. चिंते, डॉ.हंसराज बाहेती, डॉ. दिनकर काळे, डॉ. पी. बी. कुलकर्णी, डॉ. विक्रम राजपूत व डॉ. अजय पुनपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी इंडियन लातूरचे मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, कोषाध्यक्ष डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. श्र्वेता काटकर, डॉ. आकांक्षा त्रिपाठी व डॉ. वेदांत अवस्थी यांनीही सहभाग नोंदवत सहकार्य केले.

या प्रसंगी रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या लातूरच्या दत्ताआपसिंगेकर (१५१ वेळा रक्तदान), अनिल डुंगरवाल (११३ वेळा रक्तदान) आणि पारस चापसी (१३८ वेळा रक्तदान) या रक्तदात्यांचा 'अनसंग हिरोज् ऑफ लातूर' पुरस्कार देऊन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

NAME OF CHANGE DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER.
SHRIRANG SUDHAKAR CHAPOLIKAR
TO : SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
FUTURE THE SAME NAME WILL USED BY MY FAMILY HUSBAND/WIFE, CHILDREN AND RELATIVE.
OLD NAME -- SHRIRANG SUDHAKAR CHAPOLIKAR
NEW NAME-SHRIRANG SUDHAKARRAO MADREWAR
ADDRESS LAXMINARAYAN NIVAS NEAR KAVHA ROAD MANTHALE NAGAR LATUR 413 512
MOB NO. +91 9420872400

## महिला डॉक्टरांची भजन संध्या उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ जून : इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरच्या महिला विंगतर्फे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेली भजन संध्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. हॉटेल पाहुणचार येथे झालेल्या या कार्यक्रमात अध्यात्मिक आरोग्याचा संदेश देण्यात आला.

महिला विंगने यंदा सामाजिक, मानसिक, बौद्धिक, पर्यावरणीय, शारीरिक, व्यावसायिक आणि अध्यात्मिक अशा आरोग्याच्या सात पैलूंशी संबंधित विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून या भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते.

NAME OF CHANGE DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME
WHICH WAS EARLIER : ANJALI SHRIRANG CHAPOLIKAR
TO: ANJALI SHRIRANG MADREWAR
HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE ANJALI SHRIRANG MADREWAR FUTURE THE SAME NAME WILL USED BY MY FAMILY HUSBAND/WIFE, CHILDREN AND RELATIVE.
OLD NAME - ANJALI SHRIRANG CHAPOLIKAR
NEW NAME - ANJALI SHRIRANG MADREWAR
ADDRESS - LAXMINARAYAN NIVAS
NEAR KAVHA ROAD MANTHALE NAGAR LATUR 413 512
ADHAR NO. 7612 8812 4162
MOB NO.+91 9405733639

# शाळेच्या गोदामाला आग ; लाखोंचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुन -**

नांदेड शहरातील तरोडा बु. सावित्री नगर, शिव रोड परिसरात असलेल्या एका शाळेच्या गोडाऊनला रविवारी दि. ८ जून रात्री भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत गोडाऊनमधील फर्निचर, शालेय साहित्य, टेंट व इतर वस्तू जळून खाक झाल्या असून सुमारे १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

अग्निशमन विभागाला सायंकाळी ७ वाजता आगीची माहिती प्राप्त होताच प्रथम अग्निशमन पथक घटनास्थळी रवाना झाले. दरम्यान आगीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुसरे अग्निशमन वाहनही कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पाठविण्यात आले. घटनास्थळी पोहोचल्यावर टीनशेड गोडाऊनला मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे दिसून आले. गोडाऊनच्या डाव्या व



मागील बाजूस दुमजली निवासी इमारती असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. त्यामुळे अतिरिक्त खबरदारी म्हणून १४ हजार लिटर क्षमतेचे वॉटर ब्राउझर घटनास्थळी पाचारण करण्यात आले. गोडाऊनमध्ये लोखंडी बेंच, लाकडी फर्निचर, शाळेचे टेंट, कागदपत्रे व इतर शैक्षणिक साहित्य असल्याने आग पूर्णपणे विझत नव्हती. त्यामुळे महापालिकेचा जेसीबी मागवून जळालेल्या साहित्याचा ढिगारा बाहेर काढण्यात आला. त्यानंतर पुन्हा पाण्याचा मारा करून आग पूर्णपणे विझविण्यात आली व अग्निशमन दलाला ही आग नियंत्रण मिळवण्यात यश आले.

ही जागा डी. बी. हिंगोले यांच्या मालकीची असून गोडाऊनमध्ये लिटल स्कॉलर पब्लिक स्कूलचे साहित्य ठेवण्यात आले होते. शाळा व्यवस्थापनाच्या माहितीनुसार आगीत फर्निचर, टेबल, बेंच, प्लास्टिक खुर्च्या, कागदपत्रे व इतर साहित्य जळून १५ ते २० लाखाचे नुकसान झाल्याचे तेथे उपस्थित शिक्षिका कुलकर्णी यांनी सांगितले.

दरम्यान, गोडाऊनलगत असलेल्या मदन भगवान गायकवाड यांच्या राहत्या घरालाही आगीची झळ बसली. घरातील एक दरवाजा, खिडकी व पाणीपुरवठ्याची पाइपलाइन जळून सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. मात्र अग्निशमन दलाने वेळेवर कारवाई केल्याने घरातील अंदाजे दीड ते दोन लाख रुपयांचे साहित्य सुरक्षित राहिल्याचे घरमालकांनी सांगितले.

या बचाव व अग्निशमन मोहिमेत अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे, उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे यांच्यासह सावळे, लांडगे, पंडित, शिंदे, गीते, खंदारे, सोडणर तसेच वाहनचालक नरवाडे, टारपे व ताटे यांनी विशेष परिश्रम घेतले. अग्निशमन दलाच्या वेगवान व धाडसी कारवाईमुळे परिसरातील निवासी इमारती आणि लाखो रुपयांची मालमत्ता वाचविण्यात यश आल्याने नागरिकांनी अग्निशमन कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

# भोकर विज वितरण विभागाचा भोंगळ कारभार

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ९ जुन -**

ना वारा ना पाणी तरीही अचानक बत्ती गूल होते याकडे संबधित विभाग जाणीवपूर्वक दूर्लक्ष करित असून भोकर विज वितरण विभागाचा गलथान कारभार सूरु आहे याकडे वरिष्ठांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

पावसाळा तोंडावर आला असताना विज वितरण विभागाकडून दूरुस्तीच्या नावाखाली वारंवार विजपूरवठा खंडित केला जात आहे खंडित होत असलेल्या विजपूरवठ्याला ग्राहक त्रस्त असून ग्राहकांच्या समस्याकडे संबधित विभागाचे काही देणे घेणे नाही अशीच भूमीका घेत असल्याचे चित्र दिसत आहे. विजवितरण विभागाने पावसाळ्यापूर्वी दूरुस्तीची कामे करणे अपेक्षित असताना पावसाळा तोंडावर येवून ठेपला असताना दूरूस्तीच्या नावाखाली विजपूरवठा खंडित करण्यात येत असून नाहक ग्राहकांना त्रास सोसावा लागत आहे.भोकर विजवितरण विभागातील कर्मचार्‍यांवर वरिष्ठ अधिकार्‍यांचा अंकूश नसल्याने कारभार ढेपाळला आहे.रात्रीतून चार वेळा विजपूरवठा खंडीत करण्यात येतो तक्रार नोंदविण्यासाठी जो मोबाईल नंबर दिलेला आहे तो नंबर नेहमी बंद अवस्थेत असतो अनेक ठिकाणी उघड्या डिपी अढळून येतात वारंवार होत असलेल्या खंडित विजपूरवठ्यास भोकरची जनता वैतागली असून ढेपाळलेला कारभार सूधारण्यात यावा व विजपूरवठा सूरळीत करण्याची मागणी सर्वत्र होत आहे.

## लेखाधिकारी व्ही. के कांबळे सेवानिवृत्त

**उमरी** - नांदेड - परभणी जिल्हा कार्यालयतील कर्मचारी व्हि.के. कांबळे लेखाधिकारी या उत्कृष्ट सेवा करून सेवेतून निवृत्त झाले



आहेत . श्रीमती कांबळे ह्या वयाच्या ५८ वर्ष सेवा केली आहे त्यामुळे त्यांच्या सेवेबदल सर्व कर्मचारी अभिनंदन करून सेवानिवृत सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.यावेळी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित नांदेड जिल्हा कार्यालयाचे डी.एस.गायकवाड जिल्हा व्यवस्थापक यांचे हास्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुमीत सरगर ,शेख फरीद,विशाल पवार,सदाम सयद आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## अनिता जाधव यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**आदमपूर** -रोपळे बु.,ता.पंढरपूर ;जि.सोलापूर येथील परिमल सांस्कृतिक व्यासपीठ या संस्थेचा राज्यस्तरीय कथा पुरस्कार मु.चव्हाणवाडी.पो.



हाणेगाव ता. देगलूर जि.नांदेड येथील कथा लेखिका व सहशिक्षिका अनिता जाधव यांना जाहीर झाला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी कळविले आहे.नांदेड येथील इसाप प्रकाशनाने सिद्ध केलेल्या व ग्रामीण जीवनाचे चित्र दर्शविणाऱ्या 'तांड्याचे पाय' या कथासंग्रहाला पंढरपूर येथील 'कथा परिमल' हा पुरस्कार जाहीर होतो आहे,ही आनंदायी बाब आहे.लेखिका अनिता जाधव यांनी विविध माध्यमांतून आपले लेखन प्रकाशित करण्यात अग्रेसर असतात. सदरील पुरस्काराचे वितरण शनिवार दि.१३ जून रोजी लेखिकेसह मान्यवरांकडून पंढरपूर येथे भव्यदिव्य होणार आहे.

## परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषीत

**नांदेड** - जिल्ह्यात महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रीत) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ रविवार १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत जिल्ह्यातील ५८ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहेत. या परीक्षेच्या अनुषंगाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रभारी पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी आदेश निर्गमीत केले आहेत. या परीक्षा केंद्रापासून ५०० मिटरच्या परिसरात रविवार १४ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच या अधिकारी-कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॉपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर पर्यंतच्या परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर व ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

## कपास क्रांती' प्रात्यक्षिकांसाठी शेतकरी गट व संस्थांनी ऑनलाइन अर्ज करावेत

**नांदेड** - शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कापूस पिकाची उत्पादकता व गुणवत्ता सुधारणे तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने नवनिर्मिती केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती) चउझ योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विविध पीक प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येत असून पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. यंदा संभाव्य अल-निनो परिस्थितीचा विचार करून कपाशीची लागवड बेड पद्धतीने करणे तसेच मुलस्थानी जलसंधारण उपाययोजना राबविण्यावर भर देण्यात आला आहे. योजनेअंतर्गत क्लोजर स्पेसिंग पद्धतीने कापूस लागवड (९० ु ३० सेमी.), सघन कापूस लागवड (९० ु १५ सेमी.) तसेच एकात्मिक पीक व्यवस्थापन (खउच्) (९० ु ६० सेमी.) या तंत्रज्ञानांची प्रात्यक्षिके घेतली जाणार आहेत. एकात्मिक पीक व्यवस्थापनांतर्गत कपाशीसोबत मूग व उडीद या आंतरपिकांचा समावेश करण्यात आला आहे. या पद्धतीमुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते तसेच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होतो. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक विविधीकरणामुळे जोखीम कमी करण्यासही मदत मिळते. क्लोजर स्पेसिंग आणि सघन कापूस लागवड तंत्रामुळे प्रति हेक्टर झाडांची संख्या वाढून अधिक उत्पादन मिळण्याची शक्यता असते. तसेच संतुलित खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग नियंत्रण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या योजनेसाठी अर्जाची सुविधा महाडीबीटी पोर्टल (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin) वर उपलब्ध आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांनी लवकरात लवकर अर्ज सादर करावेत. मागील दोन वर्षांत पीक प्रात्यक्षिक योजनेचा लाभ घेतलेल्या गटांची यावर्षी निवड करण्यात येणार नाही. तसेच शेतकरी गट किंवा कंपनीमधील फार्मर आयडीधारक सदस्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## मोफत आरोग्य शिबीर

**आदमपूर** -ए श्री एन ऍग्रो (भविष्य निधी) भारत या संस्थेच्या वतीने सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथे मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या मोफत आरोग्य शिबिराचा जवळपास २५० रूग्णांनी लाभ घेतला.

प्रमुख पाहुणे म्हणून विलास जाधव, वसंतराव रवणे सरपंच शिंदेफळ हे उपस्थित होते. आरोग्य सल्लागार म्हणून डॉ. अमोल अंभोरे उपस्थित होते. ग्रामपंचायत आरोग्य सेवक कपिल बुक्तरे, संस्थेचे विभागीय अधिकारी गंगाधर हनुमंते, नांदेड जिल्हा प्रतिनिधी पंडितराव फुलझळके,आदी उपस्थित होते.

## दहा वर्षापासून विमानतळ सुरक्षा पथकात कार्यरत पोलीस शिपाई दीपक क्षीरसागर यांना कार्यमुक्त करा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुन -**

तीन वेळा प्रशासकीय बदली होऊन देखील मागील दहा वर्षापासून विमानतळ सुरक्षा पथकात कार्यरत असलेले पोलीस शिपाई दीपक क्षीरसागर यांना कार्यमुक्त करावे. अन्यथा या मागणीसाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघांचे हनुमंत मामीलवाड यांनी आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांची नियमाप्रमाणे दर तीन वर्षांनी बदली होत असते. तसेच जास्तीत जास्त दोन वर्षाचा वाढिव कालावधी देता येतो. परंतु नांदेड पोलिस दलातील विमानतळ सुरक्षा पथकातील पोलीस शिपाई दीपक दत्तात्रेय शिरसागर बक्कल नंबर -३१४६ यांची तीन वेळा प्रशासकीय बदली होऊन देखील त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नाही. या पथकामध्ये दीपक क्षीरसागर हे हजेरी मेजर म्हणून पदभार सांभाळतात. याचा गैरफायदा घेऊन इतर कर्मचाऱ्यांना मनमानीपणे कारभार करीत मानसिक त्रास देत असल्याचा आरोप हनुमंत मामीलवाड यांनी निवेदनात केला आहे.

नांदेडच्या विमानतळावरून मोठ्या प्रमाणात नशेच्या अमली पदार्थांची तस्करी होत असल्याची शंका व्यक्त करीत येथून चालणाऱ्या अवैध धंद्याची वसुली करण्याची जबाबदारी दीपक क्षीरसागर सांभाळतात असे मामीलवाडी यांनी निवेदनात म्हटले आहे. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी त्यांचा हजेरी मेजरचा पदभार काढला असताना देखील क्षीरसागर त्याच ठिकाणी कायम आहेत. त्यामुळे नियमबाह्यरित्या दहा वर्षापासून विमानतळ सुरक्षा पथकात कार्यरत दीपक क्षीरसागर यांना तात्काळ कार्यमुक्त करावे अन्यथा दि. ०१ जुलै २०२६ पासून आझाद मैदान मुंबई येथे हनुमंत मामीलवाड यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

## दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ आढळल्यास कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुन -**

जिल्ह्यातील दूध उत्पादक, विक्रेते, सहकारी व खासगी दुग्ध प्रकल्प, दुग्धजन्य पदार्थ उत्पादक तसेच संबंधित दुकानदारांची जिल्हास्तरीय पथकामार्फत तपासणी करण्यात येणार असून, तपासणीत भेसळ आढळल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा (एफआयआर) दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष यांनी दिले आहेत.

दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली २ जून २०२६ रोजी दूध भेसळ प्रतिबंधक समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जिल्ह्यातील भेसळीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली.

समितीच्या माध्यमातून विशेष पथके तयार करून जिल्ह्यातील विविध दूध संकलन केंद्रे, दुग्ध प्रकल्प, विक्री केंद्रे आणि दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांची तपासणी केली जाणार आहे. तपासणीदरम्यान दूध व दुग्धजन्य पदार्थांचे नमुने घेऊन त्यांची गुणवत्ता आणि शुद्धता तपासली जाणार आहे.भेसळमुक्त व सुरक्षित अन्नपदार्थ नागरिकांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसावर पेरणीची घाई करू नये; .कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुन -**

खरीप हंगाम २०२६ मध्ये संभाव्य 'अल-निनो'च्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सध्या जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाऊस सुरू असला तरी त्याचे स्वरूप वादळी वाऱ्यासह अधूनमधून पडणाऱ्या सरींचे असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

१ जूनपासून जिल्ह्यात सरासरी चार पावसाचे दिवस नोंदविण्यात आले असून, सरासरी २८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा 'अल-निनो'चा प्रभाव राहण्याची शक्यता असल्याने पावसात मोठा खंड पडू शकतो. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत, म्हणजे किमान ८० ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

अपुऱ्या पावसाच्या आधारे पेरणी केल्यास बियाण्यांची उगवण बाधित होऊन दुबार पेरणीची वेळ येऊ शकते. त्यामुळे कृषी विभागाच्या शिफारशी व स्थानिक परिस्थितीनुसारच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रत्येक गावातील सहाय्यक कृषी अधिकारी गावनिहाय व्हॉट्सप गट आणि इतर संपर्क माध्यमांद्वारे पेरणीबाबत सल्ला देत आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या गावातील शेतकरी व्हॉट्सप गटांमध्ये सहभागी व्हावे तसेच 'महाविस्तार' ॲप डाउनलोड करून कृषीविषयक अद्ययावत माहितीचा लाभ घ्यावा, असेही कृषी विभागाने म्हटले आहे.

पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवणक्षमता स्वतः तपासून पाहावी. तसेच शिफारशीनुसार बीजप्रक्रिया करूनच पेरणी केल्यास पिकांची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होईल, असे कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## लोहा बस स्थानकच्या दोनशे मिटर परिसरातुन खाजगी वाहतुकीला बंदी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ९ जुन -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागाने खाजगी वाहातुकीला चाप बसविण्याच्या उदेशाने मोहिम हाती घेतली आहें.बस स्थानकच्या दोनशे मिटर च्या आतमधून खाजगी प्रवाशी वाहतुक करता येणार नाही ,बस स्थानकच्या जवळून खाजगी वाहतुक केली तर त्या प्रवाशी वाहातुक वाहानाला दंड आकारला जाईल यासाठी वाहातुकीला पाबंद कारण्यासाठी एस.टी.महामंडळ व पोलिस प्रशासनाने हि मोहिम सक्रीय केली आहे.

लोहा बस स्थानक तुळजापुर ते नागपुर राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर आसल्याने कर्नाटक, आंध्रप्रदेश इतर राज्यातील प्रवाशाची दैनंदिन ये जा चालू आसते आणि नांदेड,परभणी,लातुर तिन जिल्ह्याच्या मध्येभागी शहर आसल्याने प्रवाशी दरोरोज ये जा करत आसतात.शहरात मोठी बाजार पेठ आहे. व्यापारी वर्ग व्यापारासाठी दरोरोज दाखल होतो.या तालुक्याची ग्रामिण व्यापती मोठी आसल्याने शेतकरी वर्ग या ठिकाणा बाजरपेठेत दरोरोज ये जा करत आसतो. या बस स्थानकावरुन दरोरोज ७०० ते ८०० बस नित्यनियमाने प्रवाशी फे-या मारत आसतात तरी खाजगी वाहातुक मोठ्या प्रमाणात लोहा



नांदेड, कंधार, गंगाखेड,अहामदपुर या मार्गावर खाजगी वहातुक जोमात चालते.

लोहा कंधार आगार अंतर्गत लोहा बस स्थानकाच्या जवळून खजगी वाहातुक मोठ्या प्रमानात होत आसल्याने एस.टी.महामंडळाला प्रवाशी तोटा सहन करावे लागत आसल्याने,खाजगी वाहातुकील पावबंद कारण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सुरक्षाधिकारी गोविंद मुळे,गनेश कदम, लोहा पोलिस अधिकारी संदीप भोसले,सय्यद आसिफ,लोहा बसस्थानक प्रमुख अधिकारी अनिल पळनाटे, पोलिस कर्मचारी विनोद भुरे,जि व्ही कारामुंगे,खंडु घोरबांड,परसराम लुंगारे,मधुकर मोरे,बस स्थानक सुरक्षारक्षक पी डी वाघमारे,एम के केंद्रे,डी पी केंद्रे,शेख लतिफ,महिला सुरक्षा रक्षक ज्योती सोनवळे यानी मोहिम हाती घेऊन खाजगी वाहातुकीला पावबंद करत आहेत.

# किनवट तालुक्यातील ठाणमांड्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदलीची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ जुन -**

तालुक्यात विविध शासकीय कार्यालयांमध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून अशा अधिकारी-कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून जोर धरू लागली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, किनवट हा आदिवासी व दुर्गम भाग असल्याने येथे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदिवासी भत्ता, दुर्गम क्षेत्र भत्ता यांसारख्या विशेष सुविधा मिळतात. मात्र, अनेक कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास न राहता नांदेडसह इतर ठिकाणांहून रोज अप-डाऊन करतात. त्यामुळे कार्यालयीन वेळेत नागरिकांची कामे वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येत आहेत. तालुक्यातील तहसील कार्यालय, सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, वन विभाग, पोलीस विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, गटविकास अधिकारी कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विकास महामंडळ, आदिवासी विकास महामंडळ, नगर परिषद कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय, कृषी विभाग आदी कार्यालयांमध्ये काही अधिकारी व कर्मचारी दीर्घकाळापासून कार्यरत असल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, एकाच ठिकाणी अनेक वर्षे सेवा बजावल्यामुळे काही कर्मचाऱ्यांनी स्थानिक पातळीवर प्रभाव निर्माण केला असून त्याचा परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होत आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुकीची माहिती देऊन वास्तव परिस्थितीपासून दूर ठेवले जात असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये आहे. शासनाकडून दरवर्षी सर्वसाधारण बदल्यांचे धोरण राबविले जाते. मात्र, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हे नियम लागू होत नाहीत का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. दुर्गम भागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे, नागरिकांच्या कामांना प्राधान्य देणे आणि शासकीय नियमांचे पालन करणे अपेक्षित असताना काही ठिकाणी त्याचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. जनतेचे म्हणणे आहे की, दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची सेवा नोंद तपासून आवश्यक त्या बदल्या करण्यात याव्यात. तसेच मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी करून शासकीय नियमांनुसार कारवाई करण्यात यावी. दरम्यान, या मागणीकडे शासन व वरिष्ठ प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा काही नागरिकांनी दिला आहे. तसेच आवश्यक असल्यास या प्रकरणी न्यायालयीन मार्ग अवलंबून उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचाही विचार सुरू असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

# नांदेड फ्रूट मार्केटमध्ये कच्च्या आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ जुन -**

मालटेकडी येथील किसान फ्रूट मार्केटमध्ये सध्या कच्च्या आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून बाजारात चांगलीच चहल-पहल पाहायला मिळत आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांमध्ये अलीकडेच झालेल्या जोरदार वाऱ्यांमुळे तसेच बदलत्या हवामानाच्या परिणामामुळे मोठ्या प्रमाणात आंब्याची फळे झाडांवरून खाली पडली आहेत. त्यामुळे कच्च्या आंब्याचा पुरवठा अचानक वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

नांदेड किसान फ्रूट मार्केटमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर कच्च्या आंब्याची वाहतूक होत



असून व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांची लगबग वाढली आहे. येथून छ. संभाजीनगर, अमरावती, मुंबई, पुणे तसेच गुजरातमधील विविध शहरांमध्ये कच्च्या आंब्याला मोठी मागणी असल्याने मालाची नियमित पाठवणी सुरू आहे.

व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत कच्च्या आंब्याची आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर बाहेरील बाजारपेठांमधूनही मागणीत वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. विशेषतः लोणचे, मसालेदार पदार्थ तसेच हंगामी खाद्यपदार्थांसाठी कच्च्या आंब्याला मोठी मागणी निर्माण झाली आहे.

कच्च्या आंब्याच्या वाढत्या आवकेमुळे नांदेडच्या फ्रूट मार्केटमध्ये आर्थिक उलाढालीला चालना मिळत असून शेतकरी आणि व्यापारी वर्गाला याचा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बाजारातील वाढती गर्दी आणि व्यापारातील हालचालींमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकारःखरेदी

माहिती मिळाल्याचा दि.०५/०६/२६फेरफाराचा दि.०८/०६/२६लिहून देणारःप्रल्हाद नरसिंगराव रा.भोकर(खाता क्र.११३२) गट/सर्व्हे क्र.४१२ लागवडीयोग्य क्षेत्र ०.३९९६ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी गट क्र.४१२ मधील क्षेत्र ०.०२२३ नरसिंगराव चंपतराव देशमूख रा.भोकर यांनी हयात असताना दस्त क्र.६५५दि.१२/१०/१९८१रोजी मूक्ताबाई नागनाथ चालीकवार यांना विक्रि केला पूढे तोच प्लॉट मधील क्षेत्र ०.०२२३ पैकी क्षेत्र ०.०१११ मूक्ताबाई नागनाथ चालीकवार यांनी दस्त क्र.१२१ दि.०९/०२/२०००रोजी दैवसलाबाई लक्ष्मणराव दासरवाड यांना विक्रि केला पूढे तोच प्लॉट दैवसलाबाई लक्ष्मणराव दासरवाड यांनी दस्त क्र.८७५ दि.२९/०९/२००१रोजी कूसूमबाई चंद्रकांत डाकोरे यांना विक्रि केला असून आज रोजी कै.नरसिंगराव चंपतराव देशमूख यांच्या वारसाच्या नावे क्षेत्र आहे करिता नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर

संमती देणारे खातेदारः१)मूक्ताबाई नागनाथ चालीकवार (खाता क्र.०)दस्त क्र.६५५ दि.१२/१०/१९८१ (२)दैवसलाबाई लक्ष्मणराव दासरवाड खाता क्र,० दस्त क्र.१२१ दि.०९/०२/२००० लिहून घेणारःकूसूमबाई चंद्रकांत डाकोरे (खाता क्र.१२१४६)गट/सर्व्हे क्र.४१२लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी. यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.८७५दि.२९/०९/२००१ प्रमाणे रक्कम रुपये ३२००० घेवून खरेदी दिली सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले.ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विविध मागण्यांसाठी उबाठा शिवसेनेचे आक्रोश आंदोलन

## वाढती महागाई, नीट पेपर लीक प्रकरण, शेतकरी प्रश्नांवर आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

वाढती महागाई, शेती उत्पादन खर्चात झालेली वाढ, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, नीट पेपर लीक आदी प्रश्नांवर उबाठा शिवसेनेच्यावतीने येथील गांधी चौकात आक्रोश आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह शेतकरी, महिला यांनी सहभाग घेतला.

उबाठा शिवसेनेचे संपर्क प्रमुख तथा उपनेते बबनराव थोरात यांच्या नेतृत्वात येथील महात्मा गांधी चौकात केंद्र व राज्य सरकार यांच्या धोरणाविरोधात आक्रोश आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी गॅस सिलेंडरच्या वाढत्या किंमतीमुळे चुल मांडून निषेध व्यक्त केला. तसेच शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत जिल्हा प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यामध्ये कोणत्याही अटी व शर्ती न लावता सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती करावी, शेतकऱ्यांना खत व बियाणे वाजवी दरात उपलब्ध करून द्यावेत, कृत्रीम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या दरांवर नियंत्रण ठेवून दर कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, सर्व कृषी निविष्ठावरील वाढती महागाई कमी करावी, नीट पेपर व अन्य गैरप्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणतीही तडजोड होणार नाही यासाठी पारदर्शक परीक्षा प्रणाली राबवावी, जीवनाश्यक वस्तूंचे दर कमी करण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, जलजीवन मिशन योजनतील भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, शेतकऱ्यांना पीकविमा द्यावा, गॅस सिलेंडर वाढ कमी करावी, जिल्ह्यातील खरबी बंधारा रद्द करावा, शक्तीपीठ मार्ग रद्द करावा आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. या आंदोलनात माजी खा शिवाजीराव माने, जिल्हा प्रमुख गोपू पाटील सावंत, संदेश देशमुख, माजी आ. संतोष टारफे, विनायकराव भिसे, सुनील काळे, राजेश पाटील गोरेगावकर, बाळासाहेब मगर, वसीम देशमुख, गणेश शिंदे, परमेश्वर मांडगे, सोपान पाटील, अनिल कदम, पराग अडकिणे, उध्दवराव गायकवाड, चंद्रकांत देशमुख, सखाराम उबाळे, आनंदराव जगताप, भानुदास जाधव, अनिल शिंदे, डॉ पार्डीकर, माऊली झटे, संतोष देवकर, पिंटू गुजर, सुनील खंडागळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन ट्रकमधून २.३४ कोटींची १२६५ सुपारीची पोती जप्त

## वारंगा फाट्यावर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा येथे एका हॉटेलसमोर उभ्या असलेल्या तीन ट्रकची अन्न व औषध प्रशासनाच्या तीन जिल्ह्यातील पथकाने छापा टाकून तपासणी केली. यामध्ये मानवी आरोग्यास अपायकारक असलेली २.३४ कोटी रूपये किंमतीची १२६५ पोते सुपारी पकडली आहे. याप्रकरणी आठ जणांविरूध्द मंगळवार दि ९ जून रोजी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

विदर्भातून वारंगा फाटा मार्गे नांदेडकडे जाणाऱ्या ट्रकमधून किड लागलेली तसेच रंग मिश्रीत सुपारी वाहतूक केली जात असल्याची माहीती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. त्यावरून परभणी, हिंगोली आणि नांदेड येथील अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने सोमवार दि ८ जून रोजी रात्री वारंगा फाटा येथे येऊन तीन ट्रकची तपासणी केली. यामध्ये तीन ट्रकमध्ये तब्बल १२६५ पोती सुपारी आढळून आली. सदर सुपारी मानवी आरोग्यास अपायकारक असल्याचे दिसून आले. याशिवाय अधिकाऱ्यांनी बिलाची तपासणी केली असता त्यामध्ये जीएसटी बिला ऐवजी कच्ची बिले वापरून कर बुडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ट्रक क्रमांक एमएच ४० बी एफ ९९१८ यातून ७६ लाख रूपये किंमतीची ४१५ पोते सुपारी जप्त केली. ट्रक क्रमांक एमएच ४० बी एफ ९९०९ मधून ७७ लाख रूपये किंमतीची ४२० पोते सुपारी तर ट्रक क्रमांक के ए ७०-४२०५ मधून ७९ लाख रूपये किंमतीची ४३० पोते सुपारी अशी एकूण २.३४ कौटी रूपये किंमतीची सुपारी जप्त केली आहे.

याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी तुषार घोपे यांच्या तक्रारीवरून ट्रक चालक बाबा शिंदे, अशोक शिंदे रा गिरवली जि अहिल्यानगर यांच्यासह श्री शिवा ट्रेडर्सव रामसी ट्रेडर्स शिवमोग्गा, गणपती प्रोडक्टस छत्तीसगड, डिलाईट ट्रेडर्स दिल्ली, श्री श्रीधर ट्रोन्सपोर्टचे मालक अशा आठ जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीनही ट्रक चालकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या प्राथमिक चौकशीमध्ये सदरील सुपारी हैदराबाद कडे नेली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. गुटखा व इतर सुगंधीत सुपारी तयार करणाऱ्या कारखान्यांना या सुपारीचा पुरवठा होत असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# शासकीय महाविद्यालयात पहिल्यांदांच खुबा सांधे शस्त्रक्रिया यशस्वी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात २९ वर्षीय मुलावर खुबा सांधेप्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली, जिल्ह्याच्या वैद्यकीय इतिहासात पहिल्यांदाच ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्याचं उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले आहे, हिंगोलीत वर्षभरापासून वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यामुळे रुग्णांना योग्य उपचार मिळत आहेत, एरवी नांदेडला रेफर होणारे रुग्ण आता शासकीय म हाविद्यालयात उपचार घेत आहेत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया देखील यशस्वीरित्या पार पडत आहेत, आज जिल्ह्यातील एका २९ वर्षीय तरुणावर खुबा सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पडली आहे अशी माहिती शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाने दिली असून या तरुणाच्या शस्त्रक्रियेसाठी अस्थिव्यागोपचार शास्त्र विभागातील विभाग प्रमुख डॉ विलास मुसळे आणि त्यांच्या टीम कडून ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, या शस्त्रक्रिया दरम्यान भुल-तज्ज्ञ डॉ सर्फराज, डॉ पुरोहित, शस्त्रक्रिया विभागातील परिचारिका अधिपरिचारिका आदींनी सहकार्य केले तर या रुग्णालयाचे अधिष्ठदाता डॉ चक्रधर मुंगल सर उप अधिषटातळ हणमंते, डॉ मनुरकर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ दीपक मोरे सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे, जिल्ह्यातील रुग्णांनी विविध शस्त्रक्रियासाठी जिल्हा हिंगोलीच्या शासकीय महाविद्यालयात भरती व्हावे असे आवाहन यावेळी रुग्णालय प्रशासनाने केले आहे.



हिंगोली- सध्या जिल्हाभरात शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त असून शेतीला लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करीत असतांना दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### हळदीचे ३५३ कट्टे चोरणारी टोळी २४ तासांत स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

हिंगोली- लिंबाळा मक्ता येथील औद्योगिक वसाहतीमधील स्टार अॅग्रोवेअर हाऊसींगच्या वेअर हाऊसमधील ठेवलेले हळदीचे ३५३ कट्टे चोरून नेल्याची घटना दि ७ जून रोजी घडली होती. या चोरीप्रकरणातील गुन्हेगारांचा तपास करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले. पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अधिक तपास करीत याप्रकरणी सय्यद साजीद सय्यद मुजीब, रा मस्तानशहा नगर, शेख अरबाज अब्दुल रौफ रा नगर परिषद कॉलनी, शत्रु पुंजाजी चव्हाण रा खरबी, सचिन उर्फ बंटी सुरेश चव्हाण रा पारधीवाडा यांना ताब्यात घेतले. अधिक विचारपूस केली असता सदरचा गुन्हा शत्रु चव्हाण व सचिन चव्हाण यांनी त्यांच्या साथीदारांसह केल्याची कबुली दिली. पथकाने चोरलेला माल आणि गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण १० लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधिकारी कमलेश मीना, उपअधीक्षक मयूर रसाळ, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दिलीप मोरे, अंमलदार प्रेमदास चव्हाण, कोंडीबा मगरे, संदीप जाधव, नितीन गोरे, विक्रम कुंदनानी, सुभाष घुगे, साईनाथ कंठे, धनंजय क्षीरसागर, शिवाजी इंगोले यांनी केली.

### अखेर रिसाला भागातील रस्त्याचे काम सुरू

हिंगोली- शहरातील रिसाला भागातील गणेशवाडी शाळा ते रेल्वे उड्डाण पूलापर्यंतचे रस्त्याचे काम शिल्लक राहील्यामुळे या भागात वाहतुकीची कोंडी होत होती. तसेच छोटे मोठे अपधात ही होत होते. यासंदर्भात सोलापूर तरूण भारतने पाठपुरावा केल्यानंतर आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दखल घेत या रस्त्याचे काम सुरू करण्याचे आदेश दिले. अखेर युध्द पातळीवर या रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# विकासाच्या गप्पा मोठ्या पण त्याहून मोठ्या नागरिकांच्या समस्या

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ जून**

एकेकाळी शांत, सुरक्षित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा पूर्ण करणारे वसमत आज मूलभूत सुविधांच्या अभावामुळे अक्षरशः हतबल झाल्याचे चित्र आहे.

शहराचा विकास होत असल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात नागरिकांना रोज नव्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या, वीज, स्वच्छता नाही, सुरक्षा नाही मग नेमकं आहे तरी काय? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

पाण्यासाठी नागरिकांची भटकंती करावी लागत आहे, कोट्यवधी रुपये खर्चून जलजीवन मिशन, विविध पाणीपुरवठा योजना आणि नवीन पाईपलाईनची कामे झाली. आजही अनेक भागातील नळ कोरडे आहेत. महिलांना ज्येष्ठ नागरिकांना आणि सर्वसामान्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. योजना पूर्ण झाल्याचे दाखवले जाते, मात्र पाणी कुठे गेले याचे उत्तर कोणाकडेच नाही.

वीज पुरवठ्याचा खेळखंडोबा महावितरणच्यागलथान कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कधीही वीज जाते किती वेळ जाणार याची माहिती नसते. विद्यार्थ्यांचे शिक्षण, व्यापाऱ्यांचा व्यवसाय आणि घरगुती जीवन विस्कळीत झाले आहे. लोकप्रतिनिधी मात्र या ज्वलंत प्रश्नावर मौन बाळगून असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग, तुंबलेल्या नाल्या, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी आणि दुर्गंधी यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छतेवर लाखो रुपये खर्च होत असल्याचे सांगितले जाते, पण शहराची अवस्था पाहता तो पैसा नेमका कुठे खर्च होतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

घरफोडी, चोरी, हाणामारी, मारामाऱ्या आणि इतर गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रात्रीच्या वेळी अनेक भागांत अंधार आणि अपुरी सुरक्षा यामुळे गुन्हेगारांचे फावते असल्याची चर्चा आहे.

लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची शांतता संशयास्पद?

शहरातील पाणी, वीज, स्वच्छता आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित ती तत्परता दिसून येत नाही. निवडणुकांमध्ये मोठमोठी आश्वासने दिली जातात, पण निवडणुका संपल्यानंतर नागरिकांच्या समस्या वाऱ्यावर सोडल्या जात असल्याची भावना जनतेत आहे. कर भरतो आम्ही, त्रासही सहन करतो आम्ही, मग सुविधा कोणाला मिळतात?

आज वसमतकरांना विकासाच्या घोषणा नकोत, तर नळाला पाणी, घरात वीज, स्वच्छ रस्ते आणि सुरक्षित वातावरण हवे आहे. अन्यथा स्मार्ट सिटीच्या गप्पा मारणाऱ्यांनी आधी वसमतला मूलभूत सुविधा असलेले शहर तरी बनवावे, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. काय होतं वसमत... आणि काय झालं वसमत? हा प्रश्न आता फक्त चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर तो हजारो नागरिकांच्या दैनंदिन वेदनेचा आवाज बनला आहे.

# दारू दुष्परिणामाबाबत पथनाट्यातून नशाबंदी मंडळाकडून जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १८ रचनात्मक कार्यातील नशाबंदी विषयावर व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यचे व्यसनमुक्ती प्रांतीय शिबिरात पथनाट्याच्या माध्यमातून मद्य सेवनाचे भीषण वास्तव चित्र राज्यस्तरीय शिबीरा उभारण्यात आले.

नशाबंदी मंडळ आयोजीत तीन दिवशीय राज्यस्तरीय व्यसनमुक्ती प्रशिक्षण शिबिरात राज्यातील महसूल निहाय नशाबंदी मंडळाचे विभागीय संघटक, राज्यात ३६ जिल्ह्यातील कार्यरत जिल्हा संघटकांची उपस्थिती होती. योगेश वानोळे यवतमाळ, हरिश्चंद्र पाल वर्धा, विशाल अग्रवाल हिंगोली, चेतना सावंत मुंबई, मारूती बनसोडे धाराशिव आदिंनी पथनाट्य सादर केले. नशाबंदी मंडळाचे पदाधिकारी,महसुल निहाय विभागीय संघटक, जिल्हा संघटक, राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारार्थी आदींची उपस्थिती होती. मानवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र शासनाचे व्यसनमुक्ती धोरण-२०११, तंबाखू नियंत्रण कायदा-२००३, तंबाखूमुक्त शाळा अभियान, नशामुक्त भारत अभियान, अमली पदार्थ विरोधी उपक्रमांचे नियोजन आदी रचनात्मक कार्यावर गटचर्चा पार पडल्या. येत्या शैक्षणिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या वार्षिक कृती आराखड्याचे नियोजन देखील करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, नशाबंदी मंडळाचे संस्थापक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत डॉ. गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या प्रतिमेस राज्यस्तरीय प्रशिक्षणा दरम्यान अभिवादन करण्यात आले. जिल्हा संघटक इला मेश्राम, चंद्रपूर यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्ती प्रतिज्ञेने समारोप पार पडला.

# वसमतच्या मीना नवघरे यांची महसूल सहाय्यक पदावर निवड



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ जून**

मुलगी शिकली, प्रगती झाली या उक्तीचा प्रत्यय पुन्हा एकदा वसमत तालुक्यात आला आहे. शिक्षण, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर मीना वैजनाथ नवघरे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ‘क’ अंतर्गत महसूल सहाय्यक पदासाठी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई येथे पोलीस महासंचालक (सिटी क्लर्क कॅडर) म्हणून त्यांची निवड झाल्याने वसमतच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि संपूर्ण वसमत तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मीना नवघरे यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि कुटुंबाचे पाठबळ असल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील मुलींनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, याचे उत्तम उदाहरण म्हणून तिच्याकडे पाहिले जात आहे.

त्यांनी पुढील सेवाकाळात आपल्या पदाचा उपयोग समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी, विशेषतः गोर-गरीब आणि वंचित नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. समाजसेवा, प्रामाणिकपणा आणि जनहिताची जाणीव जपत ती उत्कृष्ट कार्य करेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. मीना वैजनाथ नवघरे हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# खून प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी कुटुंबियांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

शहरातील एका मस्जिदीजवळ दोन जणांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात एकाचा मृत्यु झाला तर एकजण गंभीर जखमी झाला. चार महिन्यांपूर्वी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला परंतु अद्याप या प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले नाही. आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी या मागणीसाठी संपूर्ण कुटुंबिय येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहे. शहरातील एका मस्जिदीजवळ सय्यद कलीम सय्यद सलीम यांच्यावर मोहम्मद कैफ युनूस कुरेशी आणि मोहम्मद सिराज युनुस कुरेशी यांनी प्राणघातक हल्ला केला. तसेच सय्यद वसीम स. सलीम यांच्यावरही प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात सय्यद कलीम सय्यद सलीम यांचा मृत्यु झाला तर सय्यद वसीम हे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या फिर्यादीवरून दि ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरपोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु चार महिने उलटूनही पोलिसांना खूनातील मुख्य आरोपींना अटक करण्यात यश आले नाही. आरोपींना अटक करण्यासाठी पोलिस योग्य ती कार्यवाही करीत नसल्यामुळे कुटुंबियांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत या प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही अशी ठाम भूमिका कुटुंबियांनी घेतली आहे. उपोषणार्थीमध्ये सय्यद समीना स. कलीम, स.वसीम स. सलीम, स. सलीम स. महेबुब, स. गौसिया स. सलीम यांचा समावेश आहे.